cmyk


दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१८० | मंगळवार, दि.२२ ऑक्टोबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये


## संपादकीय

### 'वापरा आणि टाकून द्या' हे प्रत्येक वेळी चालणार नाही !

महाविकास आघाडीतील जागावाटपाचा तिढा जवळपास सुटल्याचे गुरुवारी 'मविआ'ने वाजतगाजत जाहीर केले होते. त्यानंतर शुक्रवारी 'मविआ'मध्ये ठिणगी उडाल्याने विधानसभा निवडणुकीला आता खरी रंगत येऊ लागल्याचे दिसून येत आहे. काँग्रेसने शिवसेनेच्या काही जागांवर दावा केल्याने उबाठा गटाचे नेते संजय राऊत यांनी आक्रमक पवित्रा घेत महाराष्ट्र काँग्रेस जागावाटपाबाबत सक्षम नसल्याचे वक्तव्य केले अन् त्यावरून राऊत–पटोले यांच्यात चांगलीच जुंपली. दोघांतील वाद मिटवण्यासाठी काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांना मुंबईत यावे लागले. अजूनही हा वाद मिटलेला दिसत नाही.

## तिसऱ्या आघाडीचे ८ उमेदवार जाहीर

मुंबई : राज्यातील विधानसभा निवडणुकांसाठी राजकीय पक्षांकडून उमेदवारांची घोषणा होत आहे. आता, यंदा उदयास आलेल्या तिसऱ्या आघाडीकडूनही उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे. माजी खासदार संभाजीराजे छत्रपती, राजू शेट्टी आणि आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वातील परिवर्तन आघाडीने आपल्या ८ उमेदवारांची नावे जाहीर केली असून, स्वाभिमानीच्या २ उमेदवारांची नावे आज २२ ऑक्टोबर रोजी जाहीर करण्यात येणार आहेत. परिवर्तन महाशक्तीकडून जाहीर करण्यात आलेल्या पहिल्या यादीत आमदार बच्चू कडू यांचे नाव असून, बच्चू कडू यांना अचलपूर मतदारसंघातून प्रहारच्या चिन्हावर उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. परिवर्तन महाशक्ती वैचारिक परिवर्तन आहे, आघाडीत बिघाडी होण्याची शक्यता आहे.

# भाजप महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांचा सगळ्यात मोठा शत्रू !

## काँग्रेसकडून जोरदार टीका

**दिल्ली । वृतसंस्था**

**राज्यात सध्या विधानसभा निवडणुकीचा ज्वर चढत आहे. राजकीय पक्ष जागावाटावरून खलबते करत असून भाजपने रविवारीच ९९ जागांसाठी उमेदवारांची यादी जाहीर केली. यानंतर काँग्रेसने आता भाजपवर हल्लाबोल करताना जोरदार टीका केली आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नावरून भाजपवर निशाना साधला आहे. भाजप महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांचा सगळ्यात मोठा शत्रू असल्याचे म्हटले आहे. खरगे यांनी याबाबत एक्सवर ट्विट करत सोमवारी (ता.२१) पोस्ट केली आहे.**



### एखादा निर्णय शेतकऱ्यांबाबत घ्यायला हवा होता – जयंत पाटील



राज्यभरात परतीच्या पावसाने प्रचंड धुमाकूळ घातला आहे. शेतपिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे. निवडणुकीच्या तोंडावर निर्णय घेण्याचा धडाका लावला होता त्यात एखादा निर्णय माझ्या शेतकऱ्यांबाबत घेतला असता तर आज कदाचित परिस्थिती वेगळी असती अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केली आहे. पाटील म्हणाले, या सरकारने काही ठराविक उद्योगपतींचा फायदा करण्यासाठी सोयाबीन व तेल बिया यांसारख्या पिकांच्या आयातीला परवानगी दिली होती. त्यामुळे शेतकऱ्यांचे आधीच मोठे नुकसान झाले होते. आता परतीच्या पावसाने शेतकऱ्यांच्या संकटात आणखी भर घातली आहे. निवडणुका तोंडावर आल्याने आचारसंहिता लागू होण्यापूर्वी निर्णय घेण्याचा जो धडाका सरकारने लावला होता. त्यात एखादा निर्णय माझ्या शेतकऱ्यांबाबत घेतला असता तर आज कदाचित परिस्थिती वेगळी असती अशी खंतही यावेळी त्यांनी व्यक्त केली.

खरगे यांनी, राज्यातील शेतकऱ्यांचा प्रश्न उपस्थित करताना, महाराष्ट्र माँगे महापरिवर्तन असे म्हटले आहे. तसेच खरगे यांनी राज्यात २० हजार शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्याचा दावा केला आहे. त्यांनी, शेतीच्या निधीमध्ये मोठी कपात, २० हजार कोटींच्या वॉटर ग्रिडच दिलेले खोटे वचन, महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्याचे फसवे आश्वासन राज्यातील जनतेला दिल्याचे म्हटले आहे. याचबरोबर भाजप सरकारने राज्यातील अन्नदात्याला नुकसानभरपाई ◀◀ पान २ वर

## बालकल्याण समितीवरील सदस्याचा लाचखोरपणा उघडकीस

**बीड । प्रतिनिधी**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सोमवार दि.२१ रोजी बालकल्याण समितीतील सदस्याला सापळा रचून १२ हजारांची लाच घेताना रंगेहात पकडले आहे. यामुळे बालकल्याण समितीवरील सदस्याचा लाचखोरपणा उघडकीस आला आहे. बीडच्या बालकल्याण समितीतील सदस्य असलेल्या सुरेश प्रभाकर राजहंस (वय–४०) यास लाच घेताना रंगेहात पकडले. तक्रारदार यांची मैत्रीण महिला बाल स्वाधार गृहात दाखल असून तिला तक्रारदार यांनी सोडवण्या करिता दि.१० ऑक्टोबर रोजी अर्ज केला होता. त्यावरून सदरील मुलीला तक्रारदार यांच्या ताब्यात देण्यासाठी बालकल्याण समितीचे सदस्य सुरेश राजहंस यांनी स्वतः करिता व समितीतील इतर सदस्य करिता ५० हजारांच्या लाचेची मागणी केली. तडजोडी अंती १२ हजार रुपये घेण्याचे ठरले होते. त्यानुसार तक्रार दाखल झाल्यानंतर लाचलूचपत विभागाच्या टिमने पंचासमक्ष सापळा लावून कारवाई केली. ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप आटोळे, अप्पर पोलीस अधिक्षक मुकुंद आघाव, पोलीस उप अधीक्षक शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक युनूस शेख, पोलीस अंमलदार, भरत गारदे, अविनाश गवळी, गणेश मेहेत्रे यांनी केली.

# आज उद्धव ठाकरे–शरद पवारांशी चर्चा

## काँग्रेस–शिवसेनेत कसलेही वाद नाहीत; नाना पटोले यांची माहिती



**दिल्ली । वृतसंस्था**

**महाविकास आघाडीत कोणतेही मतभेद नाहीत, जागा वाटपाची चर्चा सुरु असून ही चर्चा लवकरच पूर्ण होईल. आतापर्यंत काँग्रेसच्या ९६ जागांवरील चर्चा पूर्ण झाली असून, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार व शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी मंगळवारी पुन्हा चर्चा केली जाणार आहे. या चर्चेनंतर लगेचच उमेदवारांची यादी जाहीर केली जाईल, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितले आहे.**

दिल्लीत प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, शिवसेना आघाडीतून बाहेर पडणार या बातम्यात काहीही तथ्य नाही, भारतीय जनता पक्ष जाणीवपूर्वक विरोधी पक्षांबद्दल गैरसमज पसरवण्याचे प्रयत्न करत आहे. विधानसभा निवडणुकीत भाजपाचा दारूण पराभव होईल. पराभवाच्या भितीने भाजपा अशी खेळी करत आहे. काँग्रेस कडूनही अशा पद्धतीचे कोणतेही विधान आलेले नाही. महाविकास आघाडीची सत्ता महाराष्ट्रात आणण्यासाठी आमच्या सर्वांचे एकत्रित प्रयत्न सुरु आहेत. एका प्रश्नाला उत्तर देताना नाना पटोले म्हणाले की, भाजपाचे हिंदू प्रेम नकली आहे, ◀◀ पान २ वर

### भाजपाचा खोटारडेपणा, महाविकास आघाडीत एकमत – संजय राऊत



शिवसेना उबाठाचे नेते उद्धव ठाकरे यांची आणि देवेंद्र फडणवीस यांची भेट झाल्याची आणि संजय राऊत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यात फोनवरून चर्चा झाल्याचे वृत्त सोमवार सकाळपासून विविध प्रसारमाध्यमांवर सुरु होते. या वृत्तावर अखेर शिवसेना उबाठाचे प्रवक्ते तथा नेते संजय राऊत यांनी सांगितले की, भाजपाला निवडणुकीतील पराभवाची भीती आहे, त्यामुळे त्यांच्याकडून खोटी माहिती पसरवली जात आहे. महाराष्ट्रातील महाविकास आघाडी विधानसभेच्या २८८ पैकी २१० जागांवर एकमत झाले आहे. एकजुटीने निवडणुका लढवण्याचा आमचा उद्देश असून महाराष्ट्राला लुटणाऱ्या शक्तींचा आम्ही पराभव करू, असे ते म्हणाले.

## आ.बाळासाहेब आजबेंना एबी फॉर्म; धस, धोंडेंना धक्का

### अजित पवारांकडून राष्ट्रवादीच्या १६ जणांना एबी फॉर्म





**मुंबई । प्रतिनिधी**

भाजपने विधानसभा उमेदवारांची पहिली यादी जाहीर केल्यानंतर आता राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून देखील १६ जणांना एबी फॉर्म देण्यात आले आहेत. यामध्ये राष्ट्रवादीच्या अनेक विद्यमान आमदारांचा समावेश आहे. आष्टी, पाटोदा, शिरुर मतदार संघाचे आ. बाळासाहेब आजबे यांना एबी फॉर्म दिला गेल्याने माजी मंत्री व भाजप नेते सुरेश धस, माजी आ. भीमराव धोंडे यांना मात्र हा मोठा धक्का असल्याचे मानले जात आहे.

विधानसभेसाठी इच्छूक असणाऱ्या राष्ट्रवादीच्या नेत्यांनी देवगिरी गल्यावर अजित पवार यांची भेट ◀◀ पान २ वर

### यांना मिळाले एबी फॉर्म

१. संजय नसोडे २. चेतन तुपे ३. सुनील टिंगरे ४. दिलीप वळसे पाटील ५. दौलत दरोडा ६. राजेश पाटील ७. दत्तात्रय भरणे ८. आशुतोष काळे ९. हिरामण खोसकर १०. नरहरी झिरवळ ११. छगन भुजबळ १२. भरत गावित १३. बाबासाहे पाटील १४. अतुल नके १५. नितीन पवार १६. इंद्रनील नाईक १७. बाळासाहे आजबे

# बीडमध्ये डॉ.ज्योतीताई मेटे तुतारीच्या उमेदवार ?

## राजेंद्र मस्के, कुंडलिक खांडे, रमेश पोकळे हे शरद पवारांकडे जाणार ?







**बीड । प्रतिनिधी**

**गेल्या अनेक दिवसापासून शरद पवारांच्या पक्षाचा उमेदवार कोण असणार या विषयी तर्क वितर्क लावण्यात येत असून अखेर तुतारी कोण फुंकणार हे ठरले आहे?, डॉ. ज्योतीताई मेटे यांचा पक्ष प्रवेश त्याच उद्देशाने झाला असल्याचे बोलले जात असून त्याच बीडमधून शरद पवार यांच्या पक्षाच्या उमेदवार राहतील, असे राजकी जानकारांचे म्हणणे आहे. मेटे यांच्या नंतर आता भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, रमेश पोकळे, शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे सुध्दा शरद पवारांच्या पक्षात प्रवेश करणार असल्याची चर्चा आहे.**

बीड विधान सभा मतदार संघात लोकसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणात जातीवाद बोकाळला होता. नेत्यांचे मतदारांनी या निवडणुकीत ऐकले नसून जरांगे फॅक्टर प्रभावी ठरला होता. विधान सभा निवडणुकीतही मराठा विरुध्द ओबीसी अशीच टक्कर होणार असून बीड मतदार संघातून तुतारीसाठी अनेकजण इच्छुक आहेत. यात आ. संदिप क्षीरसागर, ज्योती मेटे, बी. बी. जाधव, सुरेश नवले, राजेंद्र मस्के, कुंडलिक खांडे, भागवत तावरे ◀◀ पान २ वर

### पवारांच्या पक्षात ओबीसी नेत्यांची घुसमट ?

शरद पवार यांच्या पक्षात भाजपसह इतर पक्षातील मराठा समाजातील नेते प्रवेश करीत असून पवारांच्या पक्षातील ओबीसी नेत्यांची मात्र घुसमट होत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे पवारांचा पक्ष हा मराठ्यांचा होत असल्याचे बोलले जात आहे. बीड मतदार संघात आ. संदिप क्षीरसागर यांचा पत्ता कट करण्याचा डाव त्यांच्याच पक्षातील काही नेत्यांनी आखला असल्याचे म्हटले जात आहे.

### मस्के, पोकळे यांनी घेतली जरांगेंची भेट

भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के आणि रमेश पोकळे ांनी भाजपला धक्का देणारे निर्ण घेतले असून मस्के ांनी राजीनामा दिल्यावर मनोज जरांगे पाटील यांची आंतरवली सराटीत भेट घेतली असून रमेश पोकळे यांनी सुध्दा भेट घेऊन वेगळा निर्ण घेण्याची तयारी दर्शवली आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२१ ऑक्टोबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत


| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ८.०० क्विंटल | २,४२१ | २,५४० | २,४८७ |
| ज्वारी/हायब्रिड :११६.५० क्विंटल | १,९०० | २,६४५ | २,१४६ |
| मका/लोकल :५.५० क्विंटल | २,४५० | २,४५० | २,४५० |
| तूर :७.५० क्विंटल | ८,६०० | ८,६०० | ८,६०० |
| उडीद : ३८.०० क्विंटल | ५,५०० | ७,५७० | ६,७२४ |
| बाजरी: २७.०० क्विंटल | २,१५० | २,५७१ | २,३११ |
| मुग : २.५० क्विंटल | ६,००० | ७,१०० | ६,६५७ |
| सोयाबीन: ७५३.०० क्विंटल | ३,००० | ४,४०० | ४,०२९ |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ६,५५० | ६,५५० | ६,५५० |

# सरकारी मदरसे सुरूच राहणार!

## सरकारच्या बंद करण्याच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

केंद्र आणि राज्य सरकारची सरकारी मदरसे बंद करण्याच्या निर्णयाला स्थगिती देण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी (दि.२१) दिले. राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाने राज्यांना यासंबंधी शिफारसी केल्या होत्या. मदरशांमध्ये शिक्षण हक्क कायद्याचे पालन केले जात नाही, म्हणून मदरशांना दिली जाणारी सरकारी मदत थांबवावी, असे आयोगाने म्हटले होते. केंद्राने याचे समर्थन केले आणि ◀◀ पान २ वर



# विधानसभा निवडणुकीपुर्वी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची यूवासेनेची फौज सज्ज –परमेश्वर सातपुते

**बीड । पतिनिधी**

**विधानसभा निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाने संपूर्ण बीड जिल्ह्यामध्ये जोरदार तयारी केलेली आहे. रुकी पूर्वी पक्षाची युवा सेनेची फौज सज्ज झाली असून आघाडीच्या उमेदवारांना विजयी करण्यासाठी जोरदार मोर्चे बांधणी करण्यात येत असल्याची माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी दिली. युवा सेनेच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते.**



शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व युवा सेनेचे प्रमुख आदीत्य ठाकरे यांच्या आदेशाने व शिवसेनेचे संपर्क नेते सुनील प्रभू, युवा सेनेचे वरूण देसाई, मराठवाडा समन्वयक विश्वनाथ नेरूळकर, संपर्क प्रमुख परशुराम जाधव, सहसंपर्क प्रमुख बदामराव पंडित, सहसंपर्कप्रमुख ◀◀ पान २ वर

# महाराष्ट्रात ३ दिवस पावसाचे

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्याच्या काही भागात मागील ५ दिवसांपासून पाऊस हजेरी लावत आहे. तर दुसरीकडे दुपारी उन्हाचा चटकाही जाणवत आहे. हवामान विभागाने पुढील ३ दिवस राज्यातील काही भागात पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे.**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, खानदेश आणि विदर्भातील काही भागात हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज असून, पावसावेळी विजा आणि ढगांचा गडगडाटही राहू शकतो, असेही हवामान ◀◀ पान २ वर

### बंगालच्या उपसागरात चक्रीवादळ

बंगालच्या उपसागरात दाना या चक्रीवादळाच्या निर्मितीला सुरूवात झाली आहे. हे चक्रीवादळ लवकरच बंगालच्या खाडीवर धडकण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर बंगाल सरकार हाय अलर्टवर असून, बंगालच्या किनारी जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. चक्रीवादळाच्या प्रभावामुळे २३ ते २५ ऑक्टोबर दरम्यान ओडिशा आणि पश्चिम बंगालच्या किनारपट्टी परिसरात मुसळधार पावसाची शक्यता आहे. शिवाय याचा परिणाम लगतच्या राज्यांवरही होणार असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे.



cmyk

## अग्रलेख

# 'वापरा आणि टाकून द्या' हे प्रत्येक वेळी चालणार नाही !

महाविकास आघाडीतील जागावाटपाचा तिढा जवळपास सुटल्याचे गुरुवारी 'मविआ'ने वाजतगाजत जाहीर केले होते. त्यानंतर शुक्रवारी 'मविआ'मध्ये ठिणगी उडाल्याने विधानसभा निवडणुकीला आता खरी रंगत येऊ लागल्याचे दिसून येत आहे. काँग्रेसने शिवसेनेच्या काही जागांवर दावा केल्याने उबाठा गटाचे नेते संजय राऊत यांनी आक्रमक पवित्रा घेत महाराष्ट्र काँग्रेस जागावाटपाबाबत सक्षम नसल्याचे वक्तव्य केले अन् त्यावरून राऊत-पटोले यांच्यात चांगलीच जुंपली. दोघांतील वाद मिटवण्यासाठी काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांना मुंबईत यावे लागले. अजूनही हा वाद मिटलेला दिसत नाही. दुसरीकडे महायुतीच्या जागावाटपाचा फॉर्म्युला अंतिम टप्प्यात आल्याचे सांगितले जात असतानाच भाजपने रविवारी आपल्या उमेदवारांची घोषणा करताना ९९ जणांची यादी प्रसिद्ध केली.

विधानसभा निवडणुकीत विजयी वाटचाल करण्याच्या दृष्टीने महायुतीने रणनीती आखली असून त्यादृष्टीने मोर्चेबांधणी करण्यात आल्याचे सांगितले जाते. महायुतीत जागावाटपाबाबत कुठलाही वाद नाही, जागावाटपावर योग्य चर्चा सुरू आहे असे सांगण्यात येत आहे. पाच दिवसांपूर्वी 'आता तुम्ही त्याग करा' असा इशारा गृहमंत्री अमित शहा यांनी मुख्यमंत्री शिंदेंना दिला होता. एकनाथ शिंदेंना ही भाषा समजली असेलच. लोकसभा निवडणुकीत मतांची जास्त टक्केवारी राखणाऱ्या शिंदेंना विधानसभेसाठी झुकते माप द्यावे लागणार हे लक्षात आल्याने भाजपने शिवसेनेला भावनिक आवाहन करून जास्त जागा बळकावण्याची खेळी केली आहे. लोकसभा निवडणुकीत अजिबात छाप न पाडू शकलेल्या अजित पवारांच्या राष्ट्रवादीला तडजोड करायला लावण्याऐवजी एकनाथ शिंदेंना बळीचा बकरा बनवले जात आहे. हरियाणातील यशाने भाजप हुरळून गेली आहे. परंतु 'वापरा आणि टाकून द्या' हे प्रत्येक वेळी यशस्वी होऊ शकत नाही, हे भाजपने लक्षात घ्यायला हवे. या देशात पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि राज्यपाल ही तीनच पदे महत्त्वाची आहेत. बाकी गृहमंत्र्यांसह सर्व पदे फक्त व्यवस्थेसाठी आहेत. काम पूर्ण होण्यासाठी केलेली ती व्यवस्था आहे. आम्ही तुम्हाला मुख्यमंत्रिपद दिले. तुमच्यासाठी आमच्या माणसांना त्याग करावा लागला. त्यामुळे जागावाटपात मित्रपक्षांना झुकते माप द्या, असे अमित शहा यांनी मुख्यमंत्र्यांना सांगितले होते. म्हणजेच सत्तेच्या सारीपाटात भाजपने हळूहळू पत्ते उघडण्यास सुरुवात केली. अमित शहा यांचीच री ओढताना भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री शिंदे यांनी मोठ्या मनाने त्याग करावा असा सल्ला दिला. एकनाथ शिंदे आणि अमित शहा यांच्यात काय बोलणे झाले ते मला माहीत नाही मात्र, उद्धव ठाकरे युती तोडून आघाडीत गेल्यानंतर मोठे मन करून शिंदे आमच्याकडे आले. अजित दादाही त्रासाला कंटाळून आले, त्यांचाही त्याग आहे, आमचाही त्याग आहे असे बावनकुळे म्हणाले. त्याला उत्तर देताना शिंदे गटाचे आमदार भरत गोगावले म्हणाले, भाजपने जसा त्याग केला, तसा आम्ही देखील केला. किंबहुना आम्ही केलेल्या त्यागामुळेच आम्हाला मुख्यमंत्रिपद मिळाले. राज्यात महायुतीची सत्ता आली. प्रत्येकाची भूमिका योग्य आहे. राज्यात पुन्हा महायुतीची सत्ता आणायची असेल तर सर्वांना मिळूनमिसळून काम करावे लागेल. मजेची गोष्ट म्हणजे उपमुख्यमंत्री आणि राज्याचे कर्तव्यदक्ष गृहमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात, त्याग करा असे गृहमंत्री अमित शहा म्हणालेच नाहीत! महायुतीचा जागावाटपाचा गोंधळ अथवा घोळ एक महिन्यापासून सुरू होता. त्यामुळे जागावाटपाचा विषय मिटविण्यासाठी, अमित शहा यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर दबाव वाढवला. 'तुम्हाला मुख्यमंत्री करण्यासाठी आम्ही मोठा त्याग केला' अशा शब्दांत त्यांनी एकनाथरावांचे कान टोचले. खरे पाहता उद्धव ठाकरे यांना धडा शिकवण्यासाठी शिवसेना फोडणे ही भाजपचीच गरज होती, एकनाथ शिंदे यांची नाही. आपल्या गरजेपोटी मुख्यमंत्रिपदाची लालच दाखवणे आवश्यक होते ते भाजपने केले. त्यात त्याग किंवा उपकार करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. महाविकास आघाडीचा कारभार सुरळीत चालू असताना भाजपने फोडाफोडीचे राजकारण करून, अवैध मार्गाने सत्ता स्थापन केली, शिवाय अनेक भ्रष्ट नेत्यांना आपल्या मंत्रिमंडळात स्थान दिले. सत्तेसाठी कोणत्याही थराला जाण्याची भाजपची तयारी असते हे अनेकवेळा दिसून आले आहे. तसे नसते तर ७० हजार कोटींचा भ्रष्टाचार केल्याचा ज्यांच्यावर आरोप होता ते अजित पवार मंत्रिमंडळात दिसलेच नसते. खोटे बोल पण रेटून बोल ही भाजपची रणनीती आहे. मात्र राज्याची सद्याची राजकीय आणि सामाजिक परिस्थिती पाहता भाजपाला त्यांची चाल खेळता येणार नाही. कारण शरद पवार आणि जरांगे फॅक्टर हे निवडणुकीवर सर्वात जास्त परिणाम करणारे आहेत.

# खुन करुन पळुन आलेला आरोपी स्थानिक गुन्हे पोलिसांनी केला जेरबंद



**जालना । प्रतिनिधी**

**२० ऑक्टोबर रोजी रात्री ०९:३० वाजेच्या सुमारास बहिणीस सासरवाडी येथे जबरदस्ती घेवुन का गेले याचा जाब विचारण्यास गेलेला भाऊ नामे अमोल फुलचंद नागणे, वय-२६ वर्ष, रा. चंदनझिरा, जालना याने मेव्हण्याचा नातेवाईक शंकर गजु तटवारे, वय-३५ वर्ष, रा. डोंगरगावं, ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यावर चाकुने वार करुन त्याचा खुन केला. त्यानुषंगाने सिल्लोड पोलीस ठाणे येथे आरोपी विरुध्द खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.**

आरोपी अमोल फुलचंद नागणे, वय-२६ वर्ष, रा. चंदनझिरा, जालना हा जालना येथे पळुन आलेला असल्याबाबत गुप्तबातमीदारामार्फत माहिती मिळाल्यावरुन पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बन्सल यांचे सुचनेनुसार पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांनी एक पथक तयार करुन आरोपीचा शोध घेणेबाबत सुचना दिल्या. दिनांक २१ ऑक्टोंबर रोजी आरोपीचा शोध घेत असतांना आरोपी अमोल फुलचंद नागणे, हा बस स्थानक जालना परिसरामध्ये असल्याबाबत खात्रीलायक माहिती मिळाल्याने त्यास बस स्थानक परिसरातुन ताब्यात घेतले व त्यास सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाणे येथील पोलीस अधिकारी यांचे ताब्यात देण्यात आला. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बन्सल , मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, पो.नि.सम्राटसिंग राजपुत, राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार संभाजी तनपुरे, देविदास भोजने, संजय सोनवणे, किशोर पुंगळे, सागर बाविस्कर, सर्व स्था.गु.शा.जालना व कृष्णा तंगे, साई पवार, राजु पवार या टीमने कारवाई केली.

# बीड विधानसभा मतदार संघासाठी बाजीराव चव्हाणच ठरणार बाजीगर !

**बीड । प्रतिनिधी**

बीड विधानसभा मतदार संघात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या अत्यंत जवळचा कार्यकर्ता बीड विधानसभेच्या रिंगणात. बीड विधानसभा मतदार संघामध्ये येणाऱ्या विधानसभेत युवासेनेचे मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांना लोकांची पसंती असल्याचे पहायला मिळत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांचे विश्वासू अशी ओळख असलेले बाजीराव चव्हाण यांनी शेकडो रुग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत मिळवून दिली आहे. तरुणांची एक फळी त्यांच्या मागे आहे. शेकडो रुग्णांना त्यांनी मदत केली आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून अनेक गोरगरिब रुग्णांना त्यांनी मदत केली आहे. बीड जिल्ह्यातील नव्हे तर महाराष्ट्र राज्यामध्ये तरुणांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे नेतृत्व म्हणजे बाजीराव चव्हाण आहेत. हजारो तरुणांना रोजगार मिळवून दिला आहे.बीडच्या गडात शिवसेनेचा बाजीराव चव्हाण डरकाळी



फोडणार. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून आरोग्य दूत म्हणून काम पाहणारे बाजीराव चव्हाण बीड विधानसभा निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत. जनतेच्या सेवेसाठी बीड विधानसभा विजयी होऊन अधीक काम करण्यासाठी सज्ज झाले आहेत. मागील काही दिवसांपासून बीड मतदारसंघात शेकडो गावात प्रत्यक्ष भेट देउन सामान्य नागरिकांच्या समस्या जाणून घेत त्यांच्याशी हितगूज साधत आहेत, प्रत्येक गावातून बाजीराव चव्हाण यांना उदंड प्रतिसाद मिळत आहे. आमचा नेता कसा असावा बीड मतदार संघाचा आमदार कसा असावा निस्वार्थी काम करणाऱ्या बाजीराव चव्हाण यांच्या सारखा असावा असे नागरिकांतून बोलले जात आहेत. गावागावातून नागरिकांकडून बाजीराव चव्हाण यांना मोठा विश्वास दिला जात आहे. त्यामूळे बाजीराव चव्हाण यांचा विजय ही काळ्या दगडा वरची पांढरी रेग आहे. राजकारणामध्ये सातत्याने तरुणांचा काही राजकीय नेते फक्त त्यांच्या फायद्या पुरता वापर करतात निवडणुकीमध्ये तरुणांना हाताशी धरून निवडणुक लढविने जिंकणे असे कामे करून घेतात त्या नंतर बेरोजगार तरुणांना त्या नंतर वाऱ्यावर सोडून दिले जाते परंतु लोकप्रिय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विश्वासू बाजीराव चव्हाण मात्र अश्या तरुणांना वाऱ्यावर सोडून देऊ शकत नाहीत असा विश्वास तरुणांना आहे त्यामूळे तरुणांचे उमलते नेतृत्व म्हणुन बाजीराव चव्हाण यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे. मागील काही कार्यक्रमाच्या माध्यमातून तरुणांनी दाखवून दिले आहे. त्यामूळे सध्या तरुणांच्या गळ्यातील ताईत बनले आहेत.

## जामखेड शहरात भगवान महावीरांच्या अंतिमवाणी ग्रंथाची आगम यात्रा

जामखेड। पतिनिधी

पावापुरी नगरीमध्ये हस्तिपाल राजाच्या विनंतीला मान देऊन भगवान महावीरांनी २६०० वर्षांपूर्वी आपला अंतिम चातुर्मास पावापुरी नगरीमध्ये निश्चित केला होता, ४८ तासापर्यंत निरंतर उपदेश त्यांनी समोरचनामध्ये ठेवला. आणि हस्तपाल राजा,१८ देशाचे राजा- राणी, देवी- देवता इंद्र- इंद्रायणी, लक्ष्मी,सरस्वती,शासन माता पावापुरी नगरीमध्ये या दिवशी येऊन ४८ तासापर्यंत उपदेश दिला त्यावेळी समोरचनाची रचना होते.तसेच त्यांच्या अंतिमवाणीला खूप महत्त्व आहे.

असे कार्यक्रम प्रसंगी परमपूज्य सुविज्ञाजी म.सा. बोलत होत्या. दिनांक २० ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ६.३० वाजता जैन श्रावक संघ, आयोजित जामखेड जैन स्थानक येथे सुरू असलेल्या चातुर्मास निमित्त परमपूज्य सुनंदाजी म.सा.आदी ठाणा ६ यांच्या मार्गदर्शनाने भव्य- दिव्य ऐतिहासिक मिरवणूक जामखेड शहरातून पार पडली. यावेळी पालखीतून ग्रंथाची जैन बांधवांच्या वतीने पूजा करण्यात आली. या ग्रंथांचे आशिर्वाद जेष्ठ नेते प्राध्यापक मधुकर राळेभात यांनी घेतले. या मिरवणुकीत सुमारे ७० लहान मुले - मुली यांनी साधू संतांच्या वेशभूषा केली होत्या. तसेच शहरातील व्यापाऱ्यांनी १८ देशाचे राजा- राणी यांची वेशभूषा परिधान केली होती. जामखेड शहरात ऐतिहासिक नोंद होईल अशी अलौकिक भव्य- दिव्य मिरवणूक मोठ्या उत्साहात बीड रोड, जय हिंद चौक, छत्रपती शिवाजी महाराज पेठ येथून काढण्यात आली. मिरवणुकी वेळी रथामध्ये पावापुरी देशाचे हस्तीपाल राजाचा मान प्रसिद्ध किराणा व्यापारी आसराजजी बोथरा व त्यांच्या सौभाग्यवती अंजली बोथरा यांना राणीचा बहुमान मिळाला तसेच सहपरिवाराने सहभाग घेतला. या ग्रंथ धार्मिक शास्त्र यात्रेत इंद्र - इंद्रायणी, माता लक्ष्मी, सरस्वती देवी व शासन माता यांचाही मान संजय गांधी ,कल्पना गांधी, खूशी बोगावत, मिताली गांधी, भाग्यश्री बाफना यांना मिळाला.तसेच समस्त जैन समाजातील शेठ आणि शेठाणीचा मान मिळाला. या आगम यात्रेत मोठ्या संख्येने समस्त जैन समाजातील श्रावक,श्राविका सहभागी झाले होते. जैन स्थानकामध्ये परमपूज्य सुविज्ञाजी म.सा. यांच्या व्याख्यानाने तसेच महामांगलिकने आगम यात्रेची सांगता झाली.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक १००-घनसावंगी विधानसभेचे प्रथम प्रशिक्षण

**बीड । प्रतिनिधी**

**विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी १००-विधानसभा मतदार संघासाठी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी जालना,रिता मेत्रेवार अपर जिल्हाधिकारी जालना,शशिकांत हदगल,उप जिल्हा निवडणूक अधिकारी जालना यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान केंद्राध्यक्ष,सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष आणि इतर मतदान अधिकारी यांचे प्रथम प्रशिक्षण दिनांक २१रोजी(दुपारी ११ ते २ मतदान केंद्राध्यक्ष,सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष )( दुपारी २ ते ५ इतर मतदान अधिकारी) या दोन सत्रात मॉडेल कॉलेज, राजेगाव रोड,घनसावंगी येथे संपन्न झाले.**

सदरील प्रशिक्षण वर्गास मतदान केंद्राध्यक्ष,सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष आणि इतर मतदान अधिकारी निहाय कर्तव्य व जबाबदारींचे सूक्ष्म मार्गदर्शन पीपीटी द्वारे सादरीकरण करण्यात आले.त्यामध्ये लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ च्या कलमान्वये मतदान केंद्राध्यक्ष, सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष आणि इतर मतदान अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली असून निवडणूक आयोगाच्या प्रतिनियुक्तीवर असल्याबाबतची जाण करून देण्यात आली.मतदान प्रक्रियेतील असलेले महत्वाचे टप्पांबाबत माहिती,साहित्य वाटप, मतदान पूर्व, मतदानादरम्यान, मतदान संपल्यानंतर च्या संपुर्ण जबाबदाऱ्या पार पाडणे,



निवडणूक साहित्य स्विकृती व तपासणी करणे,ई.व्ही.एम. तपासणी,व्ही.व्ही.पॅट संबंधी माहिती,चिन्हांकित फोटो मतदार यादी,मतदानाच्या आदल्या दिवशी करावयाची तयारी, मतदान केंद्रावर करावयाच्या बाबी, निवडणूक कायद्याची अंमलबजावणी, मॉकपोल बाबतचा फ्लो चार्ट, मतदानासंबंधीची गुप्तता, मतदाराची ओळख पटविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, महत्वाचे अहवाल / नमूने तयार करणे तसेच या निवडणूकीमध्ये काही नवीन बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.अशी सविस्तर माहिती मनिषा दांडगे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अंबड यांनी दिली. एकूण ४४७ मतदान केंद्राध्यक्ष यांची नेमणूक केली असून सदरील प्रशिक्षणास ४४० मतदान केंद्राध्यक्ष हजर होते. एकूण ४२९ सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष यांची नेमणूक केली असून सदरील प्रशिक्षणास ४११ सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष हजर होते आणि एकूण ९१७ इतर मतदान अधिकारी यांची नेमणूक केली असून सदरील प्रशिक्षणास ८३५ इतर मतदान अधिकारी हजर होते. सदरील प्रशिक्षणानंतर उपस्थित मतदान केंद्राध्यक्ष, सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष आणि इतर मतदान अधिकारी यांना ईव्हीएम हाताळणी करण्याबाबतचे प्रशिक्षण देण्यात आले. सदरचे प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी योगिता खटावकर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार घनसावंगी व विजय चव्हाण सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार अंबड,संतोष इथापे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा नायब तहसीलदार सोमनाथ तोतला नायब तहसीलदार घनसावंगी,मोनाली सोनवणे नायब तहसीलदार घनसावंगी,रवि जोशी गटशिक्षणाधिकारी, पं.स.घनसावंगी गोविंद नाईक, स.शि.कैलास आरगडे, स.शि.विलास मुसळे, स.शि,अशोक बडवणे,विठ्ठल कथले,किशोर थोरात यांनी परिश्रम घेतले.

## पप्पू कागदे यांना डावलले रिपाई कार्यकर्ते आक्रमक- भैय्यासाहेब मस्के

बीड । प्रतिनिधी

केज राखीव मतदार संघातून पुन्हा एकदा भारतीय जनता पार्टीने आमदार नमिता मुंदडा यांच्यावर विश्वास दाखवत त्यांना उमेदवारी जाहीर केली आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे पप्पू कागदे यांनी या जागेवर दावा केला होता वंचित घटकाचे नेतृत्व आपणच करू शकतो या त्यांच्या मागणीला भारतीय जनता पार्टी व मित्रपक्षाने अमान्य करत परत एकदा नमिता मुंदडा यांच्यावर विश्वास दाखवला. केज राखीव मतदार संघातून पप्पू कागदे यांना पुन्हा डावल्याने रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया बीड जिल्ह्यातील कार्यकर्ते चांगलेच आक्रमक झाले आहे सोशल माध्यमातून व्यक्त होत अनेकांनी भारतीय जनता पार्टीचा प्रचार न करण्याची भूमिका घेतली आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ची जिल्ह्यात ताकद आहे पप्पू कागदे यांना मानणारा मोठा वर्ग आहे मागील काही दिवसापासून केज येथे विविध आंदोलने पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेली आहे केज येथील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया मजबूत स्थितीत आहे. मात्र पुन्हा एकदा पप्पू कागदे यांना डावल्याने रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे कार्यकर्त्यांमध्ये कमालीची नाराजी दिसून येत आहे. ही नाराजी येणाऱ्या विधानसभेच्या बीड जिल्ह्यातील सहा विधानसभेत परिणामकारक असेल का? केज राखीव मतदार संघात आमदार नमिता मुंदडा यांची उमेदवारी जाहीर होताच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे बीड जिल्ह्यातील कार्यकर्ते चांगलेच आक्रमक झाले आहेत. नमिता मुंदडा या राखीव मतदार संघाचे प्रतिनिधित्व करतात मात्र आजपर्यंत त्यांनी मागासवर्गीयांच्या एकही प्रश्नावर विधानसभेत आवाज उठवलेला नाही. फक्त ही जागा राखीव असल्याने मुंदडा कुटुंबीयांनी नमिता शिरसट यांचा वापर राजकीय दृष्टिकोनातून केला असल्याचा आरोप करत मागासवर्गीयांची खरे नेतृत्व पप्पू कागदे हेच जिल्ह्यात करतात परंतु केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी पप्पू कागदे यांच्यासाठी भारतीय जनता पार्टीकडे मागणी केली असतानाही केज राखीव मतदार संघातून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चा विचार केला गेला नाही परत एकदा नमिता मुंदडा यांनाच उमेदवारी दिल्याने बीड जिल्ह्यातील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे कार्यकर्ते संतप्त झाले असून सोशल माध्यमातून प्रतिक्रिया व्यक्त करत आहेत भारतीय जनता पार्टीच्या उमेदवार नमिता मुंदडा यांचा प्रचार न करण्याची भूमिका कार्यकर्त्यांनी घेतली व रिपाई युवक शहराध्यक्ष भैय्यासाहेब मस्के यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

# पान १ वरून...

### भाजप महाराष्ट्रातल्या

देण्यास नकार दिला असून, विमा कंपन्यांना तब्बल ८ हजार कोटींचा फायदा करवून दिला. कांदा आणि सोयाबीनच्या निर्यातबंदी आणि जास्तीच्या निर्यात शुल्कामुळे शेतकऱ्यांवर भार लादल्याचे खरगे यांनी म्हटले आहे. सध्या कापूस आणि सोयाबीनच्या उत्पादनात प्रचंड घसरण झाली असून राज्याच्या दुग्ध सहकारी संस्थांवर संकट ओढावले आहे. याची कबूली सरकारनेच दिली आहे. भाजपच्या महायुती सरकारने स्वत:ला डबल इंजिन सरकार म्हटले आहे. पण आता याच डबल इंजिन सरकारला हटविण्याचे यामहाराष्ट्राने ठरवले आहे. हे सरकार गेले तरच शेतकऱ्यांचे भले होईल, असे देखील काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी म्हटले आहे.

----------

### आज उद्धव ठाकरे-शरद

नरेंद्र मोदी सत्तेत आले आणि स्वयंभू विश्वगुरु असा प्रचार करण्यात आला. या ११ वर्षात शेतकऱ्यांचा आत्महत्यांमध्ये वाढ झाली त्यात जास्त हिंदूच होते. बेरोजगाराला कंटाळून तरुणांच्या आत्महत्या झाल्या त्यातही जास्त हिंदूच आहेत. भाजपाची सत्ता आली की हिंदूवर अन्याय केला जातो हे लपून राहिले नाही. भाजपाचे हिंदुत्व हे केवळ राजकारणासाठी आहे. छत्रपती संभाजीनगर असे नामकरण केले असे जाहीरपणे सांगायचे व उमेदवारांच्या यादीत औरंगाबाद लिहायचे ही दुतोंडी भूमिका आहे. काँग्रेस पक्षाची सर्वधर्म समभावाची स्पष्ट भूमिका आहे, असेही नाना पटोले म्हणाले.

----------

### बीडमध्ये डॉ.ज्योतीताई मेटे

यांचा समावेश आहे. बीडधून आपल्यालाच उमेदवारी मिळावी यासाठी सर्वांनीच फिल्डींग लावली होती. सध्या अनेकांच्या पुणे आणि मुंबई वाऱ्या वाढल्या असून कोणत्याही परिस्थितीत माघार घ्यायची नाही, या मुडमध्ये सर्वच इच्छुक आहेत. त्यातही भाजपमध्ये का करणाऱ्या राठा समाजातील नेत्यांची घुसमट होत होती. एकीकडे जरांगे यांच्यावर भक्ती आणि दुसरीकडे पक्षनिष्ठा आणि नेतृत्वाविषयी आदर या बाबी सांभाळणे त्यांना कठीण होत होते. त्यात भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी पक्षाला रामरा करीत मोठा धक्का दिला आहे. आता ते तुतारीच्या मार्गावर असल्याचे बोलले जात असून आतापर्यंत मनोज जरांगे यांची अलिकडच्या काळात भेट घेणाऱ्या नेत्यांनी तुतारी हाती घेतली आहे. ज्योतीताई मेटे यांनी जरांगे पाटलांची भेट घेतल्यावर शरद पवारांच्या पक्षात प्रवेश केला असून राजीनामा दिल्यावर राजेंद्र मस्के यांनी सुध्दा जरांगे यांची भेट घेतली आहे. तसेच भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष रमेश पोकळे यांनी सुध्दा जरांगे पाटलांची भेट घेतली असून मस्के आणि पोकळे हे सुध्दा मेटे यांच्या नंतर लवकरच शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश करुन तुतारी हाती घेतील असे म्हटले जात आहे.

----------

### आ.बाळासाहे आजबेंना एबी

घेतली. यावेळी अजित पवार यांच्याकडून १६ जणांना एबी फॉर्म देण्यात आले आहेत. त्यांची यादी आता समोर आली आहे. बीड जिल्ह्यातील एकाच आमदाराला एबी फॉर्म देण्यात आला असून त परळीतून धनंज मुंडे, माजलगावातून प्रकाश सोळंके किंवा जयसिंह सोळंके, बीडमधून डॉ. ोगेश क्षीरसागर, शेख त ांना मात्र एबी फॉर्मच्या पहिल्या यादीतून वगळण्यात आले. तर आष्टीचे आ. बाळासाहेब आजबे यांना एबी फॉर्म देऊन अजित पवार आणि धनंज मुंडे ांनी सुरेश धस आणि भीमराव धोंडे यांना मोठा धक्का दिला आहे. धस आणि धोंडे हे भाजपचे नेत असून ते दोघेही निवडणुक लढवण्यासाठी इच्छुक आहेत. आता आजबेंना एबी फॉर्म दिला गेल्याने धस आणि धोंडे का भुमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

---------

### विधानसभा निवडणुकीपुर्वी उद्धव

डॉ. लक्षराज सानप, सह संपर्क प्रमुख बाळासाहेब अंबुरे व युवा सेनेचे विनायक चोथे यांच्या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेनेचे बीड जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्या शिफारसीनुसार माजलगाव व आष्टी विधानसभा मतदारसंघ कार्यक्षेत्रात, (माजलगाव, आष्टी विधानसभा) जिल्हा युवाधिकारी अभिषेक दिवे, उप जिल्हा युवाधिकारी कृष्णा चौरे, उपजिल्हा युवाधिकारी वचिष्ठ शेंडगे, उपजिल्हा युवाधिकारी अरुण कुडलीक, माजलगाव विधानसभा युवाधिकारी सचिन धपाटे, वडवणी तालुका युवाधिकारी नवनाथ मोरे, शिरूर तालुका युवाधिकारी साईनाथ ढाकणे, पाटोदा तालुका युवाधिकारी अजिंक्य डोरले, आष्टी तालुका युवाधिकारी शिवप्रसाद जाधव, धारूर तालुका युवाधिकारी रोहित फावडे, माजलगाव तालुका युवाधिकारी प्रदीप तांबे, आष्टी शहर युवाधिकारी रंगनाथ आजबे, पाटोदा शहर युवाधिकारी जावेद शेख, धारूर शहर युवाधिकारी रोहित फावडे, वडवणी शहर युवाधिकारी खोसे, वडवणी तालुका संघटक आण्णासाहेब शिंदे, वडवणी उप तालुका युवाधिकारी अविनाश बोंद्रे, वडवणी उप तालुका युवाधिकारी शुभम मस्के, वडवणी उपतालुका युवाधिकारी गणेश जोगदंड, वडवणी शहर संघटक सुनील शिंदे या सर्व पदाधिकार्यांच्या वरील प्रमाणे निवडी करण्यात आलेल्या असून शिवसेना जनसंपर्क कार्यालय बार्शी रोड बीड येथे शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने मनपूर्वक अभिनंदन करून पुढील वाटचालीस मनपूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलतांना जिल्हाप्रमुख म्हणाले की, आपल्याला दिलेल्या पदाचा उपयोग, सामाजिक कार्य,पक्ष संघटना वाढीसाठी करुण युवासेना संघटना मजबुत करण्यासाठी कामाला लागावे. याप्रसंगी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर, शिरूर तालुका प्रमुख सोपान काका मोरे, पाटोदा तालुका प्रमुख मुकुंद शिंदे सह सर्व शिवसैनिक उपस्थित होते.

-----------

### सरकारी मदरसे सुरूच

राज्यांना यावर कारवाई करण्यास सांगितली होती. मात्र, न्यायालयाने आयोगाच्या या निर्णयाला स्थगिती दिली आहे. सरन्यायाधीश डी.वाय. चंद्रचूड, न्यायमूर्ती जे.बी. पार्डीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने हा निर्णय घेतला. जमियत उलेमा-ए-हिंद या सामाजिक संघटनेने ही याचिका दाखल केली होती. या प्रकरणी खंडपीठाने केंद्र सरकार, राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग आणि सर्व राज्यांना नोटीस बजावली असून आणि ४ आठवड्यांत उत्तर मागितले आहे. ही स्थगिती अंतरिम असल्याचे खंडपीठाने सांगितले. जोपर्यंत या प्रकरणावर निर्णय होत नाही तोपर्यंत राज्यांना मदरशांवर कोणतीही कारवाई करण्यास बंदी घालण्यात आली आहे. एनसीपीसीआरच्या निर्देशानंतर उत्तर प्रदेश आणि त्रिपुरा राज्याने तसे आदेशही काढले होते. या दोन्ही राज्यांच्या आदेशांनाही सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली. तसेच खंडपीठाने जमियत उलेमा-ए-हिंदला उत्तर प्रदेश आणि त्रिपुरा आणि इतर राज्यांनाही याचिकेत पक्षकार बनवण्याची परवानगी दिली. दरम्यान, राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाने १२ ऑक्टोबर रोजी सांगितले होते की, शिक्षण हक्क कायदा २००९ न पाळणाऱ्या मदरशांची मान्यता रद्द करण्यात यावी. तसेच या मदरशांची चौकशी करण्यात यावी. एनसीपीसीआरने सर्व राज्यांना पत्र लिहून मदरशांना दिलेला निधी थांबवावा, असे म्हटले होते.

-----------

### महाराष्ट्रात ३ दिवस

विभागाने म्हटले आहे. कोल्हापूर, सातारा, पुणे आणि नाशिक जिल्ह्यातील घाटमाथ्यावर पावसाचा जोर काहीसा अधिक राहील, असाही अंदाज हवामान विभागाने दिला. गुरुवारी कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला. तर विदर्भातील बुलडाणा, अकोला, अमरावती, वाशीम, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातही काहणी भागात विजा आणि ढगांच्या गडगडाटासह हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि.२२ ऑक्टोबर २०२४


## डोंगरपट्ट्यात मुसळधार पाऊस, कुंडलिका नदीला पूर

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील बालाघाट डोंगरपटयातील बोरफडी, हिवरापाहाडी, देवळा ,कोरडेवाडी, पिराचीवाडी परिसरात सोमवारी दुपारी विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस झाला या पावसामुळे बोबाटी, सुळनदी सह कुंडलिका नदीला मोठा पूर आला. या पावसामुळे कुठेही जिवित अथवा वत्त हानी झाल्याचे वृत्त नाही.

या बाबत अधिक माहिती अशी की बीड तालुक्यातील बालाघाट डोंगर पट्ट्यातील हिवरापहाडी ,बोरफडी, तर केज तालुक्यातील पिराचीवाडी कोरडयाचीवाडी, खडकी देवळा परीसरात सोमवारी दुपारी विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस झाला. या पावसामुळे नदी नाल्यासह बोबाटी, सुळनदी सह कुंडलिका नदीला मोठा पूर आला. या पुरामुळे काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. या पावसामुळे कुठेही जिवित अथवा वित्त हानी झाली नाही. हा चित्रा नक्षत्रांचा पाउस रब्बी हंगामातील पेरणी साठी चांगला ठरणार आहे. असे शेतकरी वर्गाकडून बोलले जात आहे.

# केज विधानसभा मतदारसंघाचे समन्वयक बदला

## शिवसेनेचे (शिंदे गट) उपजिल्हाप्रमुख गजानन मुडेगावकर, ऋषिकेश लोमटे दादासाहेब देशमुख यांची मागणी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शिवसेना संघटनात्मकदृष्ट्या वाढली पाहिजे यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. शिवसेनाप्रमुख एकनाथराव शिंदे यांना पुन्हा एकदा मुख्यमंत्री करायचे आहे. त्यामुळे केज मतदारसंघात शिवसेना संपविण्यासाठी, शिवसेना फोडण्यासाठी जे लोक काम करीत आहेत.अशा लोकांना प्रत्येक निवडणुकीत आम्ही कसे व का सहकार्य करावे, ज्या शिवसैनिकाला मतदारसंघातील प्रश्न, समस्या माहीत आहे. व जो मतदारसंघातील आहे अशाच नेत्याला केज विधानसभा मतदारसंघाचे समन्वयक म्हणून जबाबदारी सोपविण्यात यावी अशी मागणी शिवसेनेचे (शिंदे गट) उपजिल्हाप्रमुख गजानन मुडेगावकर, शहरप्रमुख ऋषिकेश लोमटे व दादासाहेब देशमुख यांनी केली. ते अंबाजोगाईत आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

शहरातील शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, प्रशांतनगर येथे शिवसेना (शिंदे गट) यांच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषद आयोजित केली होती. या पत्रकार परिषदेत बोलताना शहरप्रमुख ऋषिकेश आण्णासाहेब लोमटे यांनी सांगितले की, विधानसभेवर भगवा पुन्हा एकदा फडकावयाचा आहे. शिवसेना संघटनात्मकदृष्ट्या वाढली पाहिजे यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. शिवसेनाप्रमुख एकनाथराव शिंदे यांना पुन्हा एकदा मुख्यमंत्री करायचे आहे. त्यामुळे केज मतदारसंघात शिवसेना संपविण्यासाठी, शिवसेना फोडण्यासाठी जे लोक काम करीत आहेत. अशा लोकांना प्रत्येक निवडणुकीत आम्ही कसे व का सहकार्य करावे ?, ज्या शिवसैनिकाला मतदारसंघातील प्रश्न, समस्या माहीत आहे. व जो मतदारसंघातील आहे अशाच नेत्याला केज विधानसभा मतदारसंघाचे समन्वयक म्हणून जबाबदारी सोपविण्यात यावी आम्ही समन्वयक म्हणून दादासाहेब देशमुख यांचे नांव सुचवित आहोत, अंबाजोगाई शहर व तालुक्यात शिवसेनेचे पाच हजारांहून अधिक सक्रिय सभासद आहेत. मराठी माणूस मोठा झाला पाहिजे, शिवसेना तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी निवडणूक लढवायची आहे. शिवसेनेकडे वैजनाथ वाघमारे, रामहरी राऊत व लहू बनसोडे



अंबाजोगाईत शिवसेनेची (शिंदे गट) पत्रकार परिषद

हे इच्छुक उमेदवार आहेत. महायुती म्हणून आम्ही काम करणार आहोत. पण, शिवसेना संपविण्याचे षडयंत्र कोणी करू नये. अन्यथा आम्हाला आमची ताकद दाखवून द्यावी लागेल असा इशारा शहरप्रमुख ऋषिकेश लोमटे यांनी दिला. तर यावेळी शिवसेनेचे (शिंदे गट) उपजिल्हाप्रमुख गजानन मुडेगावकर म्हणाले की, मुख्यमंत्री शिंदे साहेबांसाठी आम्ही महायुतीचे काम करू, ज्या शिवसैनिकाला मतदारसंघातील प्रश्न, समस्या माहीत आहे. केज विधानसभेचा समन्वयक हा मतदारसंघातीलच असावा, समन्वयकास अनुभव, मतदारसंघातील प्रश्न, समस्या माहीत असाव्यात. पाच वर्षे शिवसेनेची माणसे फोडणे, केज मतदारसंघात शिवसेना वाढू द्यायची नाही. तसेच घटक पक्ष संपविण्याचे धोरण भाजपाने अवलंबिले आहे. हे कसे विसरायचे. त्यामुळे आम्हाला भाजपाने ग्रहित धरू नये असे उपजिल्हाप्रमुख मुडेगावकर यांनी सांगितले. शिवसेनेकडून विधानसभा निवडणुक लढविण्यासाठी इच्छुक असलेल्या लहू बनसोडे यांनी मागील ३० वर्षांपासून केज राखीव मतदारसंघात फक्त एकाच कुटुंबाची सत्ता कायम आहे. त्यामुळे मतदारसंघात विकासाचे प्रश्न, समस्या सुटू शकले नाहीत. कोणत्या ही तरूणाला रोजगार उपलब्ध झाला नाही. केज मतदारसंघातील सर्वसामान्य माणूस व बहुजन समाज विकासापासून कोसो दूर आहे. त्यामुळे मतदारांनी शिवसेनेला एकदा आशिर्वाद व संधी द्यावी आम्ही संधीचे सोने करू, जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करू असे आवाहन बनसोडे यांनी केले. तर ज्येष्ठ शिवसैनिक दादासाहेब देशमुख यांनी सांगितले की, केज मतदारसंघात शिवसेनेची संघटनात्मक ताकद मोठी आहे. तरी ही निवडणूकीत आम्हाला डावलले जात आहे. आम्ही दरवेळी भाजपाला मदत केली, सत्ता मिळवून दिली तरीही भाजपाने कायमच केज मतदारसंघातील शिवसेना संपविण्याचेच काम केले आहे. अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना चांगल्या पद्धतीने चालविण्यात येत नाही त्यामुळे ऊस उत्पादक, शेतकरी सभासद त्रस्त आहेत. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांकडे विद्यमान भाजपा आमदारांनी नेहमीच दुर्लक्ष केले आहे. वीज पुरवठा सुरळीत नाही, महिनोन्महिने डिपी मिळत नाहीत. अतिवृष्टीचे पंचनामे नाहीत, शेतकऱ्यांना कसली ही मदत नाही मग विद्यमान भाजपा आमदारांचा जनतेला उपयोग काय..? महायुतीचा घटक पक्ष म्हणून आम्ही आमच्या व्यथा मांडल्या आहेत. यावर पक्ष नेतृत्वाने गांभीर्याने विचार केला नाही तर आम्हाला वेगळा विचार करावा लागेल असा इशारा दादासाहेब देशमुख यांनी दिला. पत्रकार परिषदेत उपस्थितांचे आभार दत्ता नाना देवकर यांनी मानले. या पत्रकार परिषदेला शिवसेना बीड जिल्हा सहसंघटक-दत्ता आबा बोडखे,

शिवसेना अंबाजोगाई माजी तालुकाप्रमुख-रमेश टेकाळे, शिवसेना अंबाजोगाई उपतालुका प्रमुख-दादासाहेब देशमुख, शिवसेना अंबाजोगाई उपतालुका प्रमुख- विजय जाधव, शिवसेना अंबाजोगाई उपतालुका प्रमुख-दशरथ चाटे,शिवसेना अंबाजोगाई उपतालुका प्रमुख-अवधूत कदम, शिवसेना अंबाजोगाई उपतालुका प्रमुख-खंडू पालकर, शिवसेना अंबाजोगाई उपशहरप्रमुख-दत्ता नाना देवकर, युवासेना अंबाजोगाई तालुका प्रमुख- समाधान पिसाळ.इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

## पत्रकार व त्यांच्या कुटुंबियांच्या आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषद मुंबई शाखा अंबाजोगाई व इंडियन मेडिकल असोसिएशन अंबाजोगाई च्या वतीने अंबाजोगाई शहर व परीसरातील पत्रकार व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या आरोग्य तपासणीचे शिबीर २७ ऑक्टोबर रोजी आयोजित केले आहे. या शिबिराचा जास्तीत जास्त फायदा शहर व परिसरातील पत्रकार बांधवानी घ्यावा असे आवाहन वैद्यकीय कक्ष प्रमुख डॉ राजेश इंगोले, मराठी पत्रकार परिषदेचे हल्ला विरोधी कृती समितीचे बीड जिल्हा निमंत्रक दत्तात्रय आंबेकर, तालुकाध्यक्ष प्रशांत लाटकर, डिजिटल मीडियाचे तालुका अध्यक्ष अभिजित लोमटे यांनी केले आहे.

दैनंदिन धावपळीच्या जीवनात सर्व पत्रकार बांधव आपल्या आरोग्या कडे दुर्लक्ष करतो व या मधूनच नकळत आपल्या शरीरात एखादा गंभीर आजार आपल्याला जडतो व ज्यावेळी आपल्याला हे कळते त्यावेळी वेळ हाता मधून गेलेली असते. त्या मुळेच वर्षातून किमान एक वेळ तरी आपल्या शरीरातील बदलाची माहिती व्हावी, त्यावर वेळेत उपचार व्हावेत म्हणून प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी मराठी पत्रकार परिषद शाखा अंबाजोगाई व आय एम ए सांस्कृतीक समिती महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने सर्व पत्रकार बांधव व त्यांच्या कुटुंबियासाठी आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात येत असून मराठी पत्रकार परिषदेचे वैद्यकीय कक्ष प्रमुख डॉ राजेश इंगोले यांनी अत्यावश्यक असलेल्या सर्व रक्ताच्या तपासण्या ज्याची की बाजारात मुळ तपासणी किंमत रुपये ३००० आहे परंतु आपल्याला सवलतीच्या दरात ह्या तपासण्या फक्त ८०० रुपये मध्ये करून देण्यासाठी पुढाकार घेतलेला आहे. ज्या पत्रकार बांधवांना आपल्या आरोग्या विषयी चिंता किंवा खबरदारी घ्यावी वाटते त्या सर्वांनी मंगळवार दि. २२ ऑक्टोबर रोजी सकाळी काहीही न खाता पिता (उपाशी पोटी )आपल्या रक्ताचे नमुने डॉ राजेश इंगोले यांचे समाधान मानसोपचार रुग्णालय या ठिकाणी जमा करावीत असे सांगण्यात आले आहे.



घेतलेल्या सर्व पत्रकारांच्या रक्ताचे नमुने तपासणी साठी मुबंई येथे पाठवण्यात येणार असून रविवार दि. २७ ऑक्टोबर रोजी आलेल्या ब्लडच्या रिपोर्ट नुसार तज्ञडॉक्टर डॉ दीपक कटारे (हृदयरोग तज्ञ),डॉ नागोराव डरनासे (मधुमेहतज्ञ)डॉ प्रज्ञा किनगावकर (नेत्ररोगतज्ञ), डॉ जिगिशा मुळे (त्वचा रोग तज्ञ) डॉ संदीप जोगदंड (मेडिसीन) हे डॉक्टर आपली प्रत्यक्ष तपासणी करून औषधोपचार व आहारा विषयी मार्गदर्शन करणार आहेत. हे आरोग्य तपासणी शिबीर सर्व पत्रकार बांधवासाठी खुले असल्याने अधिकाधिक पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांनी या आरोग्य तपासणी शिबिरात सहभागी व्हावे असे आवाहन मराठी पत्रकार परिषद मुंबई शाखा अंबाजोगाईच्या वतीने सर्व पत्रकार बांधवाना करण्यात येत आहे.

## राजेंद्र मस्केंनी घेतली जरांगे पाटलांची भेट



बीड । प्रतिनिधी

शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांनी भारतीय जनता पार्टी जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्यानंतर आज प्रथमच संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांची अंतर्वली सराटी येथे भेट घेतली.

लोकसभा निवडणुकीत जिल्हाध्यक्ष पदाची धुरा संभाळत सामाजिक प्रतीकुल परिस्थितीत प्रचार यंत्रणा उभी केली.

भाजपाचा निसटता पराभव झाल्या नंतर पराभवाचे खापर मराठा समाजावर फोडून राजेंद्र मस्के यांच्या कामावर संशय व्यक्त केला.अखेर काल राजेंद्र मस्के यांनी समर्थक व कार्यकर्त्यांची बैठक घेऊन भारतीय जनता पार्टीचा त्याग करून जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला. २०१९ पासून बीड विधानसभेची निवडणूक लढवण्यासाठी राजेंद्र मस्के तयारी करत आहेत.आगामी बीड विधानसभा निवडणुकीत उमेदवारी मिळावी यासाठी पक्ष नेतृत्वाकडे मागणी केली होती. परंतु प्रतिसाद नसल्याने अपक्ष निवडणूक लढवण्याची तयारी सुरू केली. यापूर्वी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्याकडे उमेदवारीची मागणी केलेली आहे. पक्षाचा राजीनामा दिल्यानंतर प्रथमच जरांगे पाटलांची सदिच्छा भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

## मंठा पोलीस ठाणे हद्दीत जुगार अड्ड्यावर छापा : ५ लाखाचा मुद्येमाल जप्त, ११ जुगाऱ्याविरुध्द कारवाई

जालना । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक यांच्या आदेशावरून पोनि श्री. पंकज जाधव स्थानिक गुन्हे शाखा जालना यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने पोलीस ठाणे मंठा हद्यीत अवैध धंद्याचे माहिती घेत असतांना, मौले लिंबखेडा शिवारात जुगार अड्डा चालु असल्याची माहिती गोपनीय बातमीदार यांचे मार्फतीने मिळाली होती. त्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने, मौजे लिंबखेडा शिवारात दि.२० ऑक्टोंबर रोजी १५:३० वाजता छापा कारवाई करुन जुगार खेळणारे रामदास भास्कर गायकवाड, वय ४० वर्ष, रा.येवती ता. लोणार जि. बुलडाणा २) प्रल्हाद शामराव नागरे, वय ४० वर्ष, रा.येवती ता.लोणार जि. बुलडाणा ३) समाधान ज्ञानदेव आघाव, वय ४३ वर्ष,



रा.अंभोरा शेळके, ता. मंठा ४) राजु रामदास कायंदे, रा.येवती ता.लोणार जि. बुलडाणा (५) सोपान साहेबराव गायकवाड, रा. टाकळखोपा ता.मंठा व अड्डा चालविणारे ०६) गजानन राठोड रा. लिंबखेडा ता. मंठा , ७) संतोष म्हस्के रा. लिंबखेडा , यांचेसह घटनास्थळावरुन वाहनासह पळुन गेलेले ०४ जुगारी असे एकुण (११) इसमांविरुध्द पोलीस ठाणे मंठा येथे महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल केला असुन, कार्यवाहीमध्ये रोख रक्कम, मोबाईल, व मोटारसायकल असा एकुण ५,२२,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार, रुस्तुम जैवाळ, कैलास खाडे, इरशाद पटेल, किशोर पुंगळे सर्व स्थानिक गुन्हे शाखा

## बीड शहरातील शाळा, महाविद्यालये, क्लासेस परिसरात चिडीमार पथक सुरू करा -अ.भा.मराठा महासंघ

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील शाळा महाविद्यालय क्लासेस परिसरामध्ये चिडीमारांचा हैदोस सुरू असून याकडे दामिनी पथक व पोलिसांचे अक्षम्य दुर्लक्ष दिसून येत आहे

आज पालक वर्गामध्ये आपल्या मुलींना क्लासेसला व इतर कामानिमित्त बाहेर पाठवावा की नाही अशी दुविधा मनस्थिती व भीतीचे वातावरण पालकांमध्ये तयार झाले असल्यामुळे आता या टवाळखोरांना अद्दल घडविण्यासाठी पोलीस प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे बीड शहरातील भयभीत झालेल्या मुलींना धीर देऊन पोलीस प्रशासनाने मुलींच्या रक्षणासाठी तातडीने बलभीम कॉलेज परिसर के एस के कॉलेज परिसर आयटीआय ग्राउंड बीड बस स्थानक चंपावती शाळा परिसर उमा किरण आदर्श नगर परिसर अशा मुलींचा वावर असणाऱ्या अनेक ठिकाणावर तात्काळ चिडीमार पथकाची नियुक्ती करावी तसेच ग्रामीण भागातून बीड शहरामध्ये शिक्षण घेत असलेल्या मुलींच्या हॉस्टेल क्लासेस कॉलेज समोर चिडीमार पथकातील कर्मचाऱ्यांचे फोन नंबर प्रसिद्ध करावेत.आणि न्यूज पेपर मध्येही सर्व कर्मचाऱ्यांचे नंबर प्रकाशित करावेत जेणेकरून मुलींना छेडछाड होत असताना तुमचे नंबर लावण्यास मदत होईल. असे निवेदन अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने आज पोलीस अधिक्षक श्री.अविनाशजी बारगळ साहेब यांना अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने जिल्हाध्यक्ष बापूसाहेब साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले यावेळी त्यांच्या समवेत निवेदन देताना मराठा महासंघाचे विभागीय उपाध्यक्ष नारायणरावजी थोरात सर मराठा महासंघाचे विद्यार्थी जिल्हाध्यक्ष भागवत मस्के मराठा महासंघाचे उपजिल्हाप्रमुख अशोकराव जोगदंड समाजसेवक देविसिंह शिंदे मराठा महासंघाचे सरचिटणीस बंडू आप्पा कोलंबडे शहराध्यक्ष दत्ता शेळके मराठा महासंघाचे पाली सर्कल प्रमुख रंजित शेळके व इतर पदाधिकारी उपस्थित होते

## सत्ताधारी आमदार म्हणतात विकास आम्हीच केला, तर इच्छुक म्हणतात आम्ही चंद्र तारे तोडून आणू..! विश्वास नेमका ठेवायचा कोणावर ?

**केज । प्रतिनिधी**

मागच्या अनेक दिवसांपासून केज विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे तिकीट कोणाला मिळणार आणि महायुती पुन्हा आपली जागा सुरक्षित ठेवणार का ? या चर्चेला उधाण आलेले आहे. मात्र यामध्ये मागच्या अनेक वर्षांपासून राखीव असलेल्या विधानसभा मतदारसंघाला नेमके काय मिळाले ? हे मात्र अद्यापही दिसून येत नाही. त्यामुळे विद्यमान आमदार जरी विकास केल्याचा डंका पिटत असतील आणि इच्छुक उमेदवार आम्ही निवडून आल्यानंतर चंद्र तारे तोडून आणून अशा वल्गना करत असतील तरीही केज विधानसभा मतदारसंघ हा मागच्या कित्येक वर्षांपासून आहे त्याच परिस्थितीमध्ये आहे. केज विधानसभा मतदारसंघावर मागच्या कित्येक वर्षांपासून मुंदडा कुटुंबीयातील सदस्यांची मक्तेदारी आहे. स्वर्गीय विमलताई मुंदडा यांच्यानंतर पोट निवडणूक वगळता त्याच कुटुंबाकडे सत्ता आहे, मग तो पक्ष कोणताही असो. केज विधानसभा मतदारसंघांमध्ये केज, आंबेजोगाई हे दोन तालुके आणि नेकनूर शहरासारखा एक मोठा भाग समाविष्ट झालेला आहे. परंतु या मतदारसंघांमध्ये अद्यापही कुठलेच असे शाश्वत काम झालेले नाही. बेरोजगारांच्या हाताला काम मिळेल असा प्रकल्प सत्ताधारी आमदार नमिता मुंदडा यांच्याकडून कार्यान्वित झालेला नाही. पूर्ण पाच वर्ष मतदार संघातील नागरिकांना केवळ आश्वासने द्यायची असाच काहीसा प्रकार दिसून येत आहे. विधानसभा मतदारसंघांमध्ये अद्यापही एमआयडीसी कार्यान्वित झालेली नाही. केज शहरातील फलोत्पादन च्या जागेचा प्रश्न रेंगाळत पडलेला आहे. ग्रामीण भागातून येणाऱ्या गावकऱ्यांना आपला भाजीपाला विकायला बसण्यासाठी जागा सुद्धा उपलब्ध करून देता आलेली नाही.केज शहर दिवसेंदिवस झपाट्याने वाढत असताना साधे खेळाचे मैदान असो किंवा एखादा बगीचा सुद्धा उभारता आलेला नाही. ग्रामीण भागातील काही तुरळक रस्ते वगळता आजही खड्ड्यांतून आणि गुडघाभर चिखलातून नागरिकांना चालावे लागत आहे. केज शहरातील अतिक्रमणाचा प्रश्न सोडवून छोट्या व्यावसायिकांना कायमस्वरूपी जागा देण्यामध्ये सत्ताधारी आमदार नमिता मुंदडा फेल ठरलेल्या आहेत. शहर म्हणून आणि आपण त्याचे काही देणे लागतो हा विचार करून अद्यापही नळ योजना नवीन तर सोडाच परंतु आहे ती सुद्धा दुरुस्त करता आलेली नाही. केज शहरातील जो विस्तारित भाग आहे त्या भागात अद्यापही नळ योजना पोहोचलेली नाही. अंतर्गत रस्ते हे अपवाद वगळता जैसे थे आहेत. त्यामुळे एवढे सारे प्रश्न प्रलंबित असताना नेमका विकास कोणता केला ? हे मात्र समजायला मार्ग नाही. आणि आम्ही मतदारसंघाचा किती विकास केला याचा डांगोरा मात्र पिटल्या जात आहे.

तर दुसरीकडे या निवडणुकीसाठी डझनवर इच्छुक उमेदवार मतदार संघात डेरेदाखल झाले आहेत. जिथे नाही तिथे जाऊन सत्ताधाऱ्यांचा निष्क्रियपणा आणि आम्ही निवडून आल्यानंतर विकास काय असतो हे दाखवून देऊ अशी वल्गना करत आहेत. आश्वासने देताना अगदी चंद्र तारे सुद्धा तोडून आणून असे सांगायला ते कचरत नाहीत. मात्र प्रत्येक निवडणुकीत जे काही होते तेच मागच्या तीन-चार महिन्यांपासून ऐकायला मिळत आहे. विकासाच्या वल्गना आणि विकासाची स्वप्न हे ऐकूनच मतदारांना भुलवत ठेवण्याचा एक कलमी कार्यक्रम सध्या तरी दिसून येत आहे. दरम्यान एवढी वर्षे सत्ता आपल्या हाती असताना प्रश्न जर प्रलंबित असतील आणि आम्ही किती विकास केला हे सांगण्याची वेळ जर येत असेल तर खरोखरच विकास झालाय का ? याचाही विचार मतदारांनी करण्याची गरज आहे. कारण सूर्य उगवल्यानंतर मी उगवलो आहे हे सांगण्याची गरज सूर्याला भासत नाही. मग विकास आम्हीच केलाय हे सांगण्याची गरज सत्ताधारी आमदारांना का लागावी ? हे कोडेच आहे. त्यामुळे सत्ताधाऱ्यांनी काहीच केले नाही आणि इच्छुक काही करतील असा विश्वास नसल्याने कुणी कितीही वल्गना केल्या तरी केज मतदार संघातील नागरिकांच्या संघर्षामध्ये काही फरक पडणार का ? याचाही डोळसपणे विचार करणं गरजेचं आहे. एक कुणीतरी निवडून येणारच आहे आणि मतदार संघाचे प्रतिनिधित्व करणारच आहे. परंतु वर्षानुवर्ष असेच चालत राहिले तर मतदारांनी नेमकं कुणाकडे बघायचं हा प्रश्न अनुत्तरीत आहे.

पान ६ वरून...

### जिल्ह्यासह महाराष्ट्रातील

मेटे यांनी नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला आहे. आज त्याच अनुषंगाने बीड जिल्हा शिवसंग्राम कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांची बैठक या ठिकाणी बोलवण्यात आली आहे. या ठिकाणी उपस्थित

सर्वांनीच ताईंच्या या निर्णयाचे स्वागत केले असून मी ठामपणे डॉ. ज्योतीताई मेटे यांना विश्वास देतो की बीड जिल्ह्यासह राज्याची शिवसंग्राम ठामपणे आपल्या पाठीशी उभी आहे. असे मत यावेळी शिवसंग्रामचे प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे यांनी व्यक्त केले.तसेच या बैठकीत उपस्थिताशी संवाद साधताना शिवसंग्राम जिल्हाध्यक्ष नारायणराव काशीद यांनी पुढील वाटचाल आणि संघटना बांधणीवर कार्यकर्त्यांशी चर्चा करत शिवसंग्राम एकसंघ डॉ. ज्योतीताई मेटे यांच्या सोबत असल्याचा विश्वास दिला. या प्रसंगी शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, प्रदेश सरचिटणीस नितीन लाठकर, जिल्हाध्यक्ष नारायणराव काशीद, जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे, शहर अध्यक्ष सुहास पाटील, जिल्हा उपाध्यक्ष रामदास नाईकवाडे, बीड विधानसभा प्रमुख प्रा.सुभाष जाधव, मा.पंचायत समिती सभापती ज्ञानेश्वर कोकाटे, बीड तालुका अध्यक्ष नवनाथ प्रभाळे, गेवराई तालुका अध्यक्ष कैलास माने, आष्टी तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर चौधरी,अंबेजोगाई तालुका अध्यक्ष धनेश गोरे,शिरूर तालुका अध्यक्ष माऊली शिंदे, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा मनीषा कुपकर, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक पंडित माने, सचिन कळकुटे, मजूर सहकारी संस्थेचे संचालक बाळासाहेब हावळे, खरेदी विक्री संघाचे संचालक गोपीनाथ घुमरे, मा. नगरसेवक दत्ता गायकवाड यांच्या सह सर्व आघाड्यांचे जिल्हाध्यक्ष , सरपंच , ग्रामपंचायत सदस्य सह कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### केजमध्ये आमदार

तर इतर दोन्हीही महिला उमेदवार ठोंबरे व घाडगे एका इच्छुक उमेदवाराला जर उमेदवार द्यायचे ठरले तर जरांगे पाटील गटाकडून उमेदवारी मिळू शकते साठेंना आघाडीचे उमेदवारी मिळाली तर जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे केज मध्ये आपली ताकद लावतील ?खंबीरपणे साथ देतील का ?अशीही मतदारसंघातील कार्यकर्त्यातून दबक्या आवाजात चर्चा सुरू आहे.

### परतुर मतदारसंघाच्या

जि.जालना येथे दिनांक २१ ऑक्टोबर २०२४ सोमवारी भारतीय जनता पार्टी तर्फे आयोजित तळणी व जयपूर या दोन जिल्हा परिषद सर्कल मधील कार्यकर्त्यांच्या बैठकीत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. पुढे बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की मुख्यमंत्री लडकी बहीण योजना, दिव्यांग बांधवांच्या योजना, मुख्यमंत्री लाडकी लेक योजना, सावित्रीबाई फुले स्वातंत्र्य स्वयं योजना, अनाथ बालकांच्या योजना आशा केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून राज्यभरात राबविलेल्या शेकडो योजनांचा लाभ तळागाळातील सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्याकरिता आपण परतूर मंठा जालना या तहसील कार्यालया सह जिल्हा अधिकारी जालना यांच्या दालनात आढावा बैठक घेऊन परतुर मंठा वनेर सेवली सर्कल मध्ये भव्य जनजागृती मेळावा व कॅम्पचे आयोजन केले होते यातून मतदारसंघातील लाखो लाभार्थ्यांना याचा लाभ मिळाला असून. मोदी आवास योजना शबरी आवास योजना रमाई आवास योजना यशवंतराव चव्हाण आवास योजना या कार्यक्रमास हजारो भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
मंगळवार दि. २२ ऑक्टोबर २०२४
४

# अंजिराची शेती करून कमवा बक्कळ नफा



कमी खर्च आणि जास्त नफा यामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणात अंजीरच्या रोपांची लागवड करीत आहेत. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याकडे लक्ष देणारे सरकार पारंपारिक पिकांऐवजी नगदी पिकांच्या लागवडीस प्रोत्साहित करीत आहे. अलिकडच्या काळात कृषी क्षेत्रात मोठा बदल झाला आहे.

अंजीर पिकासाठी लागणारे हवामान : उष्ण व कोरडे हवामान अंजिराला चांगले मानवते. त्यामुळे महाराष्ट्रात हे फळ आणखी मोठया क्षेत्रात करायला भरपूर वाव आहे. कमी उष्णतापमान या पिकाला घातक ठरत नाही. ओलसर दमट हवामान मात्र निश्चितपणे घातक ठरते. विशेषतः कमी पावसाच्या भागात जिथे ऑक्टोबर ते मार्चपर्यंत पाण्याची थोडीफार सोय आहे अशा ठिकाणी अंजिर लागवडीस वाव आहे.

अंजीरसाठी उपयुक्त जमीन : अगदी हलक्या माळरानापासून मध्यम काळया व तांबडया जमिनीपर्यंत अंजीर लागवड शक्य आहे. भरपूर चुनखडी असलेल्या तांबूस काळया जमिनीत अंजीर उत्तम वाढते. चांगला निचरा असलेली एक मीटर पर्यंत खोल असलेली कसदार जमीन अंजीरासाठी उत्तम होय. मात्र या जमिनीत चुन्याचे प्रमाण असावे. खूप काळया मातीची जमिन या फळझाडाला अयोग्य असते. खोलगट आणि निचरा नसलेल्या जमिनीत हे झाड पाहिजे तसे चांगले वाढत नाही.

सुधारीत जाती : अंजिराच्या अनेक जाती आहेत. त्यात सिमरना, कालिमिरना, कडोटा, काबूल, मार्सेल्स, (व्हाईट सान पेट्रो) आदी जाती प्रसिध्द आहेत. पुणे भागातील पुना अंजीर नावाने प्रसिध्द असलेली जात (ऍड्रिऍटिक ) किंवा कॉमन या प्रकारातील असून महाराष्ट्रात मुख्यतः हीच जात लावली जाते.

रोपवाटिकेत अंजीर झाड तयार करणे : अंजीर वनस्पती प्रामुख्याने १ ते २ सेमी जाड, १५ ते २० सें.मी. लांबीच्या परिपक्व कलमांद्वारे तयार होतात. हिवाळ्यातील मादा झाडांनापासून कलम घेतले जाते व ते १ ते २ महिन्यांपर्यंत कॅल्शिनिंग साठी जमिनीत दाबले जातात. तापमान फेब्रुवारी ते मार्च पर्यंत वाढू लागताच,ह्या कलमांना १५१५ सेमी च्या अंतरावर रोपवाटिकेत लावली जातात.

अंजीर लागवड : शेताची तयारी करताना खोदलेल्या खड्ड्यात संतुलित खत व खाद्य घालून रोपे लावा. ८८ मी अंतरावर लागवड योग्य आहे, आणि लागवड करण्याची वेळ डिसेंबर ते जानेवारी किंवा जुलै ते ऑगस्ट पर्यंत करावी.

काढणी : उप-उष्णकटिबंधीय प्रदेशांमध्ये, वसंत ऋतूमध्ये येणारी फळे मे ते ऑगस्ट दरम्यान पिकून तयार होतात. जेव्हा फळे पूर्णपणे पीकतात तेव्हाच त्यांची काढणी करावी. तोडल्यानंतर, ४०० ते ५०० ग्रॅमपेक्षा जास्त फळ कंटेनरमध्ये ठेवू नये. जर फळे मोठ्या प्रमाणात काढायच्या असतील तर ती पाण्याने भरलेल्या भांड्यात गोळा करावीत.

## रब्बी हंगामातील भेंडी लागवड



रब्बी हंगाम सुरू होणार आहे. या हंगामात शेतकरी बराच भाजीपाला लागवड करतात. या पिकामध्ये भेंडी ही मुख्य भाजी मानली जाते. याची देशभरात मोठी मागणी आहे. भेंडी लागवडीपासून शेतकरी एका हंगामात चांगले उत्पन्न मिळवू शकतात. चला मग भेंडीच्या प्रगत प्रकार आणि तिच्या लागवडीबद्दल जाणुन घेऊ.

रब्बी भेंडी : या हंगामात भेंडीची लागवड केल्याने भेंडीचे झाड लहान राहते आणि जलद उत्पन्न देते. प्रगत वाण : परभणी क्रांती, पुसा सावनी, पंजाब पद्मिनी, पूजा ए -४, आर्का भय, अर्का अनामिका, पंजाब -७, पंजाब -१३ भेंडी, योग्य जमीन : भेंडीची लागवड सर्व प्रकारच्या मातीमध्ये करता येते, परंतु चिकणमाती, बाळूई चिकणमाती आणि मटियार लोम माती अधिक उत्पादनासाठी योग्य मानली जातात. बियाणे प्रक्रिया : यासाठी बिया २४ ते ३६ तास पाण्यात भिजत ठेवल्या जातात. यानंतर त्या सावलीच्या जागी सुकत ठेवा. बियाणे पेरण्यापूर्वी कोणत्याही बुरशीनाशकात प्रति किलो २ ग्रॅम दराने चांगले मिसळावे. बियाण्याचे प्रमाण : उन्हाळी हंगामात भेंडीच्या लागवडीसाठी २० किलो तर पावसाळ्याच्या लागवडीसाठी प्रति हेक्टरी १२ किलो बियाणे आवश्यक आहे. पेरणीची पद्धत : भेंडी पेरताना एका रांगेपासून दुसऱ्या रांगेचे अंतर ३० सेमी आणि एका रोपांचे ते दुसऱ्या रोपाचे अंतर १२ ते १५ सें.मी. असावे. सिंचन : संपूर्ण शेताला योग्य आकाराच्या पट्ट्यामध्ये विभागून घ्या जेणेकरून सिंचनामध्ये सोयीचे होईल. पावसाळ्यात पाणी साचू नये म्हणून भेंडीची पेरणी उंच बेडमध्ये करावी. कापणी : सुमारे अडीच महिन्यांनी पीक कापणीसाठी तयार होते. तोडणीनंतर ३ ते ५ दिवस भेंडी खाण्यायोग्य असते, तर पुसा सावनी ह्या प्रकारात हा कालावधी ७ दिवस असतो. उत्पादन : योग्य तंत्राने भेंडीची लागवड केल्यास प्रति हेक्टरी ११५ ते १२५ क्विंटल उत्पादन मिळू शकते. शेतकरी बांधवांना यातून चांगले उत्पन्न मिळू शकते.


## बहुवार्षिक चारापीक लसूणघासचे लागवड तंत्रज्ञान

लसूणघास लागवडीसाठी मध्यम पोयटायुक्त; तसेच काळी कसदार व उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी. आम्लयुक्त जमिनीत बियाण्याची उगवण कमी होऊन प्रती हेक्टरी रोपांची संख्या कमी होते. पर्यायाने उत्पादनात घट येते. हे पीक तीन वर्षांपर्यंत शेतात राहते. त्यामुळे जमिनीची चांगली मशागत करावी. लागवडीसाठी तीन मीटर रुंदीचे वाफे तयार करावेत. वरंबे थोडे रुंद व जाड करावेत. जमिनीच्या उतारानुसार वाफ्याची रुंदी ठेवावी किंवा ३ ४ मीटर अंतराचे वाफे तयार करून घ्यावेत. जास्त पावसाच्या भागात व काळ्या जमिनीत वरंबे प्रमाणापेक्षा जास्त उंच ठेवू नयेत. पावसाळ्यात वाफ्यामध्ये पाणी साचून मर रोगाचा प्रादुर्भाव दिसतो. मर रोगामुळे पीक विरळ होते.

जमीन व हवामान : जमीन, हवामान व पाण्याच्या उपलब्धतेनुसार वार्षिक अथवा बहुवार्षिक सुधारित जातींची निवड करावी. आनंद-२, आनंद-३ आणि आनंद-८ या वार्षिक जाती आहेत. राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठातील चारापिके संशोधन प्रकल्पाने 'आरएल-८८' ही सुधारीत बहुवार्षिक जात विकसित केली आहे. लसूणघासाचे भेसळविरहीत न फुटलेले टपोरे व शुद्ध बियाणे पेरणीसाठी वापरावे. आजकाल लसूणघासाच्या बियाण्यामध्ये अमरवेल व इतर बियाण्याची भेसळ आढळते. असे असल्यास बियाणे पेरणीपूर्वी चाळून घ्यावे. घासाच्या बियापेक्षा लहान असलेले अमरवेलाचे बियाणे व इतर तणांचे बी वेगळे करता येते.

बीजप्रक्रिया : पेरणीपूर्वी प्रती किलो बियाण्यास ३० ग्रॅम रायझोबिअम जीवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी. सर्वसाधारण एक हेक्टर क्षेत्रावर घासाची पेरणी करावयाची असल्यास चार लिटर पाण्यात ५०० ग्रॅम गूळ मिसळावा. हे मिश्रण उकळून थंड करावे. त्यात २५० ग्रॅम रायझोबिअम जिवाणू संवर्धक मिसळावे. हे द्रावण बारीक चाळलेल्या मातीत चांगले मिसळून घ्यावे. नंतर २५ किलो बियाण्यास हळुवारपणे चोळावे. थोडा वेळ सावलीत वाळवून नंतर पेरणी करावी.

लागवड : लसूण घासाची पेरणी ऑक्टोबर ते डिसेंबर महिन्यात केल्यावर अधिक फायदा होतो. पेरणीसाठी हेक्टरी २५ किलो बियाणे लागते. पेरणी करताना दोन ओळींतील अंतर ३० सें.मी. ठेवावे. त्यामुळे आंतरमशागत करणे सोपे जाते. काही शेतकरी लसूणघासाची पेरणी बी फोकून करतात.



त्यामुळे बियाणे जास्त लागते. उगवण एकसारखी होत नाही. पुढे आंतरमशागत करता येत नाही. तणांचा प्रादुर्भाव जास्त झाल्यास तणासकट घासाचे रोपे मुळासकट उपटली जातात. शेतात नांगे पडतात.

खत व्यवस्थापन : पिकाच्या जोमदार वाढीसाठी हेक्टरी १० टन चांगले कुजलेले शेणखत अथवा कंपोस्ट खत पेरणीपूर्वी शेवटच्या कुळवणी अगोदर शेतात सारख्या प्रमाणात पसरावे. पेरणीच्या वेळी हेक्टरी २० किलो नत्र, ८० किलो स्फुरद व ४० किलो पालाश द्यावे. बहुवार्षिक लसूण घासापासून भरपूर चारा उत्पादनासाठी; तसेच चार कापण्यांनंतर खुरपणी करून हेक्टरी १५ किलो नत्र, ५० किलो स्फुरद किंवा १०० किलो डीएपी द्यावे.

आंतरमशागत : बहुवार्षिक असलेल्या या पिकामध्ये तणांचा प्रादुर्भाव वाढतो. त्यामुळे लसूणघासाच्या प्रत्येक कापणीनंतर खुरपणी करावी. तीन कापण्यानंतर कोळपणी करावी. त्यामुळे माती भुसभुशीत राहून जमिनीत हवा खेळती राहते. पिकाच्या मुळाजवळील खोडाच्या भागात मातीची भर लागते. पीक जोमदार वाढते.

पाणी व्यवस्थापन : जमिनीचा मगदूर व हंगामानुसार वेळेवर पुरेसे पाणी देणे महत्त्वाचे आहे. हिवाळ्यात १० ते १२ दिवसांनी, उन्हाळ्यात ८ ते १० दिवसांनी व पावसाळ्यात गरजेनुसार पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. प्रमाणापेक्षा जास्त पाणी दिल्यास घासाची रोपे मरण्याचे प्रमाण वाढते.

कापणी : लसूणघासाची पहिली कापणी पेरणीनंतर ४५ ते ५० दिवसांनी जमिनीपासून ५ सें.मी. उंचीवरून धारदार विळ्याने करावी. त्यापुढील कापण्या २१ ते २५ दिवसांच्या अंतराने कराव्यात.

उत्पादन : लसूणघासाचे सरासरी १०० ते १२० टन हिरव्या चाऱ्याचे (१० ते १२ कापण्या) उत्पादन वर्षभरात मिळते. बियाण्याचे उत्पादन ४ ते ५ क्विंटल मिळते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

४००४ ई. पू. : उस्शेर कालक्रमानुसार सुमारे संध्याकाळी सहा वाजता जग तयार केले गेले.
१६३३ : लियाओउलू उपसागाराची लढाई: मिंग राजघराण्याने डच ईस्ट इंडिया कंपनीला पराभूत केले.
१७९७ : बलूनमधून १००० मीटर उंच जाऊन पॅराशूटच्या साहाय्याने आंद्रे जॅक्स गार्नेरिन जमिनीवर उतरणारा पहिला मानव बनला.
१९२७ : निकोला टेस्ला यांनी सिंगल-फेज इलेक्ट्रिकसह सहा नवीन शोध लावले.
१९३८ : चेस्टर कार्लसनने जगातील पहिले झेरॉक्स मशिन तयार केले.
१९६३ : पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते भाक्रा धरण राष्ट्राला अर्पण करण्यात आले.
१९६४ : फ्रेन्च लेखक, कवी आणि तत्त्वज्ञ जेआँ-पॉल सार्त्र यांना नोबेल पुरस्कार मिळाला पण त्यांनी तो नाकारला.
१९९४ : भारतीय उद्योगपती नवीनभाई सी. दवे यांना ब्रिटनच्या महाराणी एलिझाबेथ यांचा उद्योग व शिक्षण क्षेत्रातील कार्याबद्दल कोट ऑफ आर्म्स पुरस्कार जाहीर.
२००१ : ग्रँड थेफ्ट ऑटो ३ हा वीडीओ गेम प्रकाशित झाला.
२००८ : भारताने पहिल्या मानवविरहित चांद्रयान-१ चे प्रक्षेपण केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६८९ : पोर्तुगालचा राजा जॉन (पाचवा) यांचा जन्म. (मृत्यू: ३१ जुलै १७५०)
१८७३ : अमृतानुभवी संत तीर्थराम हिरानंद गोसावी ऊर्फ स्वामी रामतीर्थ यांचा जन्म. (मृत्यू: १७ ऑक्टोबर १९०६)
१९०० : भारतीय स्वातंत्र्यसैनिक अश्फाकुला खान यांचा जन्म. (मृत्यू: १९ डिसेंबर १९२७)
१९४२ : आंतरराष्ट्रीय ख्यातीचे छायाचित्रकार रघूवीर सिंह यांचा जन्म. (मृत्यू: १८ एप्रिल १९९९ न्यूयॉर्क)
१९४७ : भारतीय वंशाचे अमेरिकन डॉक्टर व लेखक दीपक चोप्रा यांचा जन्म.
१९४८ : इंग्लंडचा गोलंदाज माईक हेंड्रिक यांचा जन्म.
१९८८ : भारतीय अभिनेत्री परिणीती चोप्रा यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१७ : इंडियन जर्नल ऑफ मेडिकल रिसर्चचे संस्थापक चार्ल्स पार्डे ल्यूकिस यांचे निधन.
१९३३ : थोर देशभक्त बॅ. विठ्ठलभाई पटेल यांचे निधन. (जन्म: १८ फेब्रुवारी १८७१)
१९७८ : साहित्यिक व वक्ते नारायण सीताराम तथा ना. सी. फडके यांचे निधन. (जन्म: ४ ऑगस्ट १८९४)
१९९१ : देहदान चळवळीचे पुरस्कर्ते व देहदान सहाय्यक मंडळाचे संस्थापक ग. म. सोहोनी यांचे निधन.
१९९८ : हिंदी चित्रपटांतील खलनायक अजित खान ऊर्फ अजित यांचे निधन. (जन्म: २७ जानेवारी १९२२)
२००० : अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे प्रमुख कार्यवाह, सामाजिक कार्यकर्ते व उद्योगपती अशोक मोतीलाल फिरोदिया यांचे निधन.
२०१४ : भारतीय दिग्दर्शक आणि सिनेमॅटोग्राफर अशोक कुमार यांचे निधन.

# उत्तम बियाण्यांसाठी शास्त्रीय कांदा बीजोत्पादन


कांद्यामध्ये हंगामानुसार आणि रंगानुसार अनेक जाती आहेत. कांदा व लसूण संशोधन संचालनालयाने भीमा डार्क रेड, भीमा रेड, भीमा राज, भीमा सुपर, भीमा शक्ती, भीमा किरण, भीमा लाइट रेड, भीमा शुभ्रा, भीमा श्वेता आणि भीमा सफेद या कांद्याच्या दहा जाती विकसित केल्या आहेत. बीजोत्पादन करताना उत्तम प्रतीच्या कांद्यांची निवड करणे आवश्यक असते. बऱ्याच वेळा शेतकरी चांगले कांदे बाजारात विकतात आणि खराब कांदे बीजोत्पादनासाठी वापरतात. त्यामुळे कांद्याच्या नवीन पिढीमध्ये अनेक वैगुण्ये वाढीला लागतात. चांगला वाण टिकवून ठेवायचा असल्यास आणि त्यामध्ये अधिक सुधारणा करायची झाल्यास उत्तम कांद्याची निवड करावी. आपल्याकडील चांगल्या कंदाची बियाण्यासाठी लागवड करणे अत्यंत आवश्यक आहे.

हवामान : कांदा पीक हे बीजोत्पादनाच्या दृष्टीने तापमानास अत्यंत संवेदनशील आहे. पराग सिंचनाच्या काळात तापमान ३५ अंश सेल्सिअसच्या पुढे वाढले तर मधमाश्यांचा वावर कमी होतो. परिणामी बीजोत्पादन कमी होते. तापमानाव्यतिरिक्त स्वच्छ सूर्यप्रकाशसुद्धा बीजोत्पादनासाठी आवश्यक असतो. ढगाळ हवामान किंवा पाऊस यामुळे रोगांचे प्रमाण वाढते. स्वच्छ सूर्यप्रकाश आणि कोरडे हवामान यामुळे फलधारणा चांगली होते.

जमीन : मध्यम ते भारी जमिनीत कांदा बीजोत्पादन चांगले होते. जमीन पाण्याचा चांगला निचरा होणारी असावी. चोपण किंवा क्षारयुक्त जमिनीत उत्पादन चांगले येत नाही. तसेच हलक्या किंवा मुरमाड जमिनीत बीजोत्पादन घेऊ नये. अशा जमिनीत फुलांचे दांडे कमी निघतात आणि बी कमी तयार होते.

मातृकांद्यांची निवड आणि लागवड : कांदा बीजोत्पादनातील सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे मातृकांद्याची निवड होय. तयार होणाऱ्या बीजाची शुद्धता आणि गुणवत्ता प्रत्येक पिढीतील कांदा निवडीवर अवलंबून असते. त्यामुळे मातृकांद्याची निवड करताना निष्काळजीपणा करू नये. चपटे किंवा जाड मानेचे कांदे लागवडीकरिता निवडू नये. कांद्याचा रंग आकर्षक आणि एकसारखा असावा. कांदे गोल, मध्यम किंवा मोठ्या आकाराचे असावेत. सर्वसाधारणपणे मध्यम आकाराचे कांदे वापरले तर हेक्टरी २५ ते ३० क्विंटल कांदे बियाणे म्हणून लागतात. कांद्याचे वजन ७० ते ८० ग्रॅमच्या दरम्यान असावे आणि व्यास ४.५ ते ६ सें.मी. इतका असावा. प्रत्येक कांद्याचा वरचा एक तृतीयांश भाग कापून काढावा. शक्यतोवर एका डोळ्याचे कांदे निवडावेत. कांदे निवडण्यापूर्वी ते चांगले सुकलेले असावेत. सालपट निघालेले, काजळी आलेले, कोंब आलेले किंवा सडलेले कांदे बीजोत्पादनासाठी अजिबात वापरू नये.

प्रक्रिया आणि लागवड : कापून तयार केलेले कांदे कार्बोसल्फान २ मि.लि. अधिक कार्बेन्डाझिम २ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे तयार केलेल्या द्रावणात अर्धा तास बुडवून ठेवावेत. त्यानंतर त्यांची लागवड करावी. सरी वरंब्यावर लागवड करताना ४५ सें.मी. अंतरावर सऱ्या पाडाव्यात. सरीच्या एका बाजूवर ३० सें.मी. अंतरावर बीजोपचार केलेले कांदे लावावेत. कंद मातीमध्ये पूर्ण झाकले जातील अशा पद्धतीने लावावे. ठिबक सिंचनावर लागवड करावयाची झाल्यास ५० सें.मी. अंतरावर सऱ्या पाडाव्यात. दोन सरींच्या तळाशी २० सें.मी. अंतरावर कांदे ठेवावेत. एक सर मोकळी सोडावी. कांदे ठेवलेल्या सरीचा माथा सपाट करावा. त्यामुळे सरींच्या तळाशी ठेवलेले कांदे मातीने चांगले झाकून जातात. शिवाय ठिबक सिंचनाच्या नळ्या पसरवण्यास सपाट जागा तयार होते. एका



जोड ओळीसाठी एक ठिबक सिंचनाची नळी वापरता येते.

खत व्यवस्थापन : चांगल्या बीजोत्पादनासाठी खतांचा संतुलित वापर करणे आवश्यक आहे. लागवडीच्या २० दिवस अगोदर २५ टन चांगले कुजलेले शेणखत जमिनीत पसरवून नांगरट करावी. याच बरोबर १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद, ५० किलो पालाश आणि ५० किलो गंधक यांची शिफारस करण्यात आली आहे.

तण व्यवस्थापन : कांदा बीजोत्पादन पिकात तणांचा बंदोबस्त करणे मोठे जिकिरीचे काम असते. विशेषतः फुलांचे दांडे निघाल्यानंतर खुरपणी करणे अवघड जाते. या काळात खुरपणी करताना मजूर आत घुसले तर फुलांच्या दांड्याची मोडतोड होऊन नुकसान होते. फुल येईपर्यंत एक खुरपणी करता येते. कांदे लावल्यानंतर साधारणपणे ४५ दिवसांनी खुरपणी करावी. तण नाशक वापरणार असल्यास, पेंडीमिथॅलीन ३ मि.लि. प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारावे आणि लगेच पाणी द्यावे. पाणी देण्यास ३-४ तासांपेक्षा जास्त उशीर झाल्यास तणनाशकाची परिणामकारकता कमी होते. तणनाशकाचा परिणाम साधारणपणे ४५ दिवसांपर्यंत राहतो. त्यानंतर पाण्यासोबत किंवा हवेसोबत वाहून येणारे गवताचे बी रुजू लागते आणि तण परत वाढते. अशावेळी ४५ दिवसांनी दुसऱ्यांदा पेंडीमिथॅलीनची फवारणी केली तर तणाचा उपद्रव बराच कमी करता येतो.

कीड आणि रोगांचे व्यवस्थापन : कांदा बीजोत्पादनाच्या पिकावर फुलकिडे आणि लाल कोळी यांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात होतो. जांभळा करपा आणि तपकिरी करपा या बुरशीजन्य तसेच आयरिश यलो स्पॉट व्हायरस आणि ऍस्टर येलो ड्वार्फ व्हायरस या विषाणूजन्य रोगांचा प्रादुर्भाव होत असतो. या रोगांचे नियंत्रण करण्यासाठी कार्बेन्डाझिम २ ग्रॅम किंवा क्लोरोथॅलोनिल २ ग्रॅम किंवा मॅन्कोझेब ३ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे रोगाच्या तीव्रतेनुसार दर १० ते १५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. किडींच्या संरक्षणासाठी कांदा लावतेवेळी थायमेट १० किलो किंवा कार्बोफ्युरान ३५ किलो प्रति हेक्टरी मातीत मिसळावे. यामुळे लागवडीपासून जवळ-जवळ एक महिना कीड नियंत्रण होते.

त्यानंतर रसशोषक किडीच्या नियंत्रणासाठी डायमिथोएट १ मि.लि., प्रोफेनोफॉस १.५ मि.लि. किंवा सायपरमेथ्रीन १ मि.लि. प्रति लिटर पाणी या प्रमाणे चिकटद्रव्यासोबत मिसळून फवारणी करावी. गरजेनुसार दर १० ते १५ दिवसांच्या अंतराने कीडनाशक बदलून फवारणी करावी. रोग आणि किडीच्या बंदोबस्ताकरिता बुरशीनाशक आणि कीटकनाशक यांची एकत्र फवारणी करता येते. या सर्व फवारणी फुले उमलण्यापूर्वी कराव्यात. फुले उमलल्यानंतर फवारणी केल्यास मधमाश्यांच्या वावरावर आणि पर्यायाने परागसिंचन आणि फलधारणेवर परिणाम होतो. हे लक्षात ठेवावे.

काढणी आणि सुकवण : काढणी सकाळी वातावरणात आर्द्रता असताना करावी. गोंड्यावर हलकासा ओलसरपणा असल्याने बी गळून पडण्याची भीती नसते. गोंडे ओढून न काढता खुडून काढावेत. गोंडे काढल्यानंतर ताडपत्रीवर पसरवून ५ ते ६ दिवस उन्हात चांगले सुकवून घ्यावेत. चांगल्या प्रकारे सुकलेल्या गोंड्यातून बी काठीने हळूहळू कुटून वेगळे करावे. त्यानंतर उफणनी करून बी स्वच्छ करावे. हलके, फुटलेले, पोचट बी चाळणीच्या साह्याने किंवा प्रतवारी यंत्राच्या साह्याने वेगळे करून उत्तम प्रतीचे बियाणे एकत्र करावे.

पाणी नियोजन : बीजोत्पादनासाठी कांदे लावल्यानंतर पहिले पाणी हलके द्यावे. पहिल्या पाण्यानंतर लगेच कोंब फुटून निघतात. उघडे पडलेले कांदे मातीने झाकून घ्यावेत आणि दुसरे पाणी द्यावे. कांदा बीजोत्पादन सर्वसाधारणपणे मध्यम ते भारी जमिनीत घेत असल्यामुळे दोन पाळ्यांमधील अंतर ८ ते १० दिवस ठेवावे. प्रत्येक पाळीत नेहमी हलके पाणी द्यावे. कांदा पिकाची मुळे १५ ते २० सें.मी. खोल जातात. तेवढाच भाग ओला राहील इतकेच पाणी देणे गरजेचे असते. पाणी जास्त झाले तर कंद सडतात. हलक्या जमिनीत पाणी ६ ते ८ दिवसांच्या अंतराने द्यावे. पाणी कमी पडल्यास बी वजनाने हलके राहते आणि त्याची उगवण क्षमता कमी होते. ठिबक सिंचनावर बीजोत्पादन चांगल्या प्रकारे घेता येते. एक मीटर अंतरावर ठिबक सिंचनाच्या नळ्या पसरवून नळीच्या दोन्ही बाजूंनी कांदा लागवड करून पाणी देता येते. ठिबक सिंचनामुळे पाण्याची ३० ते ३५ टक्के बचत होते, पाणी देणे सुलभ होते. शिवाय तणांचे प्रमाणसुद्धा कमी राहते.

# बिंदुसरेतील कालिंदेश्वर मंदिर बिल्डरांच्या पाशातून मुक्त

## सामाजिक कार्यकर्त्यांचा कालिंदेश्वराच्या चरणी अभिषेक: डॉ.गणेश ढवळे





बीड। प्रतिनिधी

बीड शहरातील फुलाई नगर मोंढा परीसरातील बिंदुसरा नदीपात्रातील पुरातण कालिंदेश्वर मंदिर बिल्डरांच्या तावडीतून मुक्त व्हावे यासाठी २ वर्षांपासून सुरू केलेला लढा अखेर यशस्वी होऊन सदर गट नंबर १९३ मधिल ४६ गुंठे जमीन भोगवटदार वर्ग २ मधुन वर्ग १ मध्ये करण्याचा तत्कालीन उपजिल्हाधिकारी (भुसुधार) प्रकाश आघाव यांचा आदेश जिल्हाधिकाऱ्यांची मान्यता घेतलेली नाही, तहसीलदारांचा अहवाल न घेताच आधिकाराचा गैरवापर झाला सदर इनाम जमिन सक्षम प्राधिकारी यांचे पुर्व परवानगी शिवाय वाटणी प्रबंध असताना जमिनीचे वाटपपत्र केल्यामुळे या प्रकरणात शर्थभंग झाल्याचे दिसून येत असल्याचे नमूद करत जुना आदेश विद्यमान उपजिल्हाधिकारी सामान्य) शैलेश सुर्यवंशी यांनी रद्द करण्यात येत असल्याचे उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठातील शासकीय अभियोक्त्यांना कळवले आहे. त्यामुळे अखेर कालिंदेश्वर मंदिर बिल्डरांच्या पाशातून मुक्त झाले असुन यानिमित्ताने आज दि.२१ सोमवार रोजी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, रामनाथ खोड,सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार, बप्पासाहेब पवार यांनी कालिंदेश्वर मंदिरात विधिवत अभिषेक करून ईश्वर चरणी लिन होत आनंद व्यक्त केला.

## महर्षी वाल्मिकी ऋषी यांची जयंती उत्साहात साजरी



अंबाजोगाई। प्रतिनिधी

येथील धानोरा (बु.) ता. अंबाजोगाई जि. बीड या गावी दिनांक २०/१०/२०२४ वार रविवार रोजी आद्यकवी महर्षी वाल्मिकी ऋषी यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कोळी राष्ट्रसंघ चे महाराष्ट्र अध्यक्ष, मा. बळीराजे वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हाध्यक्ष मा. रवि दहिभाते यांच्या नेतृत्वात महर्षी वाल्मिक ऋषी यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली त्यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धानोरा बु. चे सरपंच मा. आबासाहेब पांडे, उपसरपंच श्रीकांत सोमवंशी,ज्येष्ठनेते सुदाम (नाना) सोमवंशी व ग्रा.प.सदस्य रवि सोमवंशी, प्रशांत चिवडे यांच्यासह सर्व सदस्य तसेच युवा कॉंग्रेस चे प्रदेश सचिव मा. शंभुराजे देशमुख, शिवसेना (शिंदे गट) चे अंबाजोगाई तालुका अध्यक्ष मा. ऋषी भैया लोमटे, प्रमुख पाहुणे म्हणून बीड जिल्हा युवा नेते मा. राजपाल भैय्या काकडे हे उपस्थित होते. केज, अंबाजोगाई, परळी, तालुक्यासह कोळी राष्ट्रसंघ च्या माध्यमातून सर्व बीड जिल्ह्यातील आदिवासी कोळी समाजाला योग्य न्याय मिळवून देण्यासाठी मी कायम प्रयत्नशील आहे व या पुढे ही राहणार आहे २०२५ मध्ये बीड जिल्ह्यात जास्तीत जास्त ठिकाणी जयंती चे आयोजन करण्यात येणार आहे असे थोडक्यात मनोगत व्यक्त केले. त्यावेळी जयंती उत्सव समिती चे सदस्य-किरण दहिभाते, महादेव दहिभाते,संतोष दहिभाते,प्रशांत दहिभाते,प्रमोद दहिभाते,अनिल दहिभाते,अक्षय दहिभाते,अजय दहिभाते, समाधान दहिभाते, ऋषिकेश दहिभाते,योगेश नीळकंठ,आशिष नीळकंठ,श्रीराम नीळकंठ,गोविंद नीळकंठ,अभिषेक बेस्के,माऊली जाधव,मुकेश पांडे,रोहित फोलाने, विवेक तपसे,ओम पांडे,प्रतीक सरवदे,अक्षय घुले यांच्या सह धानोरा बु. परीसरातील कोळी बांधव व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेख फसीयोद्दीन याना एमआयएमची उमेदवारी मिळणार



धारूर। प्रतिनिधी

धारूर येथील सामाजीक कार्यकर्ते माजी नगरसेवक शेख फसीयोद्दिन याना एम आय एम ची उमेदवारी जवळपास निश्चीत झाली असून युवक वर्ग मोठ्या संख्येने त्यांचे पाठीशी असून मतदारा मधून त्याना उस्फुर्त प्रतीसाद मिळत असुन पक्षा कडून त्याची उमेदवारी लवकरच घोषीत होईल आशी चर्चा कार्यकर्त्यात केली जात आहे.

धारूर शहरातील सामाजीक कार्यात सतत अग्रेसर असणारे धारूर नगरपरीषदेचे माजी नगरसेवक शेख फसीयोद्दिन हे गेल्या पंचेवीस वर्षा पासुन सामाजीक राजकीय क्षेत्रात सक्रिय कार्यरत आहेत युवक वर्गा साठी त्याचेविशेष कार्य आहे सामाजीक कार्यात ही ते सतत सक्रीय असतात त्यानी माजलगाव विधानसभा मतदारसंघातून या मतदारसंघाचे सर्वांगीण विकासा साठी सर्व जाती धर्माना बरोबर घेऊन जाण्या साठी एम आय एम कडे उमेदवारीची मागणी केली असून त्याचे कार्याची दखल घेऊन या विधानसभा मतदार संघात त्याची उमेदवारी जवळपास निश्चीत झाल्याचे समजते. युवक वर्गातून तात्काळ त्यांची उमेदवारी जाहीर करावी आशी मागणी युवक वर्गातून होत आहे. शेख फसीयोद्दिन याची उमेदवारी एम आय एम कडून जाहीर होणार असे संकेत दिसताच येथील निवडणुट चुरशीची होणार याची जोरदार चर्चा होत आहे

## कॉंग्रेस पक्षाला मतपत्रिकेवर येऊ द्या,नसता जिल्हात पक्ष गोठेल

### कॉंग्रेस पक्ष्याच्या सन्मानासाठी केज मतदार संघातून लढणारच-दत्ता कांबळे



माजलगाव । प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीच्या पार्शश्वभुमीवर भारतीय कॉंग्रेस पक्षाचे अनु. जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी जिल्हातील कॉंग्रेस पक्ष जिवंत ठेवण्यासाठी पक्षश्रेष्ठिला भावनिक हाक दिली आहे. जिल्हायातील कॉंग्रेस पक्ष जिवंत राहण्यासाठी कॉंग्रेस पक्षश्रेष्टीने जिल्ह्यातील किमान तीन मतदार संघावर दावा केला होता, परंतु आघाडी धर्मात जुळून घेण्यासाठी किमान परळी आणि केज हे दोन मतदार संघ सोडून घ्यावेत असा आग्रह होता.परंतु आघाडी मध्ये कॉंग्रेस ला जिल्ह्यातील एकाही मतदार संघात कॉंग्रेस पक्षाला जागा मिळत नसेल तर, जिल्ह्यातील भारतीय कॉंग्रेस पक्ष मतपत्रिकेवर आलाच नाही तर पक्ष आणि पक्षाच्या संघटनेशी जुडलेला कार्यकर्ते जिवंत राहणार नाहीत, परिणामी जिल्ह्यातील पक्ष संघटना गोठेल याची दक्षता पक्ष श्रेष्ठीने घ्यावी अशी भावनिक हाक पक्षाचे अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे पक्षश्रेष्ठिकडे केले आहे.

तसेच सद्या कॉंग्रेस मधील डझन भर कार्यकर्त्यांनी पक्ष श्रेष्टीकडे आपल्याकडे असणाऱ्या पदाचा व पक्ष्याच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामे देण्याच्या हालचाली सुरु केल्या असून, केज किंवा परळी मतदार संघात कॉंग्रेस पक्षाला उमेदवारी मिळाली नाही तर जिल्हाभरतील कॉंग्रेस कार्यकर्ते सांगली पॅटर्न राबून कॉंग्रेस जिवंत ठेवण्यासाठी प्रयत्न करतील याची नोंद पक्ष श्रेष्ठी व महाविकास आघाडी यांनी घ्यावी असा इशारा ही अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे इशारा दिला आहे. तसेच कॉंग्रेस पक्षाच्या जिल्ह्यातील प्रत्येक कार्यकर्त्यांनी आपला स्वाभिमान आबादित ठेवण्यासाठी उमेदवारी अर्ज भरून उमेदवारी लढवण्याचं आव्हान करत, आपण स्वतः केज विधानसभा मतदार संघातून उमेदवारी अर्ज भरून पक्षाच्या सन्मानासाठी उमेदवारी लढवणारच असा इशारा कॉंग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.

## बांधकाम कामगारांची फसवणूक करणाऱ्या सरकारचा जाहीर निषेध



वडवणी। प्रतिनिधी

राज्यातील ५५ लाख बांधकाम कामगारांना दिवाळीला पाच हजार रुपये सानुग्रह अनुदान ( बोनस )देणार असे निवडणुकीच्या तोंडावर जाहीर करून बांधकाम कामगारांची फसवणूक करणाऱ्या भाजप आणि महायुती सरकारचा लाल बावटा बांधकाम कामगार संघटनेचे वतीने जाहीर निषेध करीत असल्याचे पत्रक कॉ.बी.जी.खाडे आणि कॉ.ओम पुरी यांनी प्रसिद्धीस दिले आहे.

कालच राज्यामध्ये विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली आहे, आजपर्यंत राज्यातील एकाही कामगारांच्या खात्यावर ५००० रुपये आलेले नाहीत, आणि या दिवाळीपर्यंत हे जाहीर केलेले सानुग्रह अनुदान मिळणार सुद्धा नाही, राज्यात आज ५५ लाखापेक्षा जास्त बांधकाम कामगार नोंदीत आहेत, मात्र कामगार मंत्री खाडे यांनी फक्त २७ लाख कामगारांना सानुग्रह अनुदान घोषित करून २८ लाख कामगारांच्यावर अन्याय केला आहे,यामुळे राज्यातील बांधकाम कामगारानी येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत या भाजप आणि महायुती सरकारला धडा शिकवावा असे आवाहन ही लाल बावटा बांधकाम कामगार संघटनेने राज्यातील बांधकाम कामगारांना करीत आहोत.

## वाचन प्रेरणा दिन निमित्त भित्तिपत्रकाचे प्रकाशन




बीड। प्रतिनिधी

महिला कला महाविदयालय, बीड येथे एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील ग्रंथालय विभागातर्फे डॉ. अब्दुल कलाम यांचे विचार यावर आधारित भितीपत्रकाचे प्रकाशन महाविद्यालयाच्या प्राचार्य मा.डॉ. संध्या आयस्कर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थी विकास विभागाच्या डॉ.चित्रा धामणे उपस्थित होत्या. विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने सलग ग्रंथ वाचन उपक्रम आयोजित करण्यात आला होता. महाविद्यालयातील ग्रंथालय विभागाने विद्यार्थिनींना ग्रंथ उपलब्ध करून देऊन या उपक्रमात सहभाग नोंदवला. याप्रसंगी बोलताना महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर म्हणाल्या की नियमित वाचनाने आपल्या ज्ञानात भर पडते, स्वतःचा आत्मविश्वास वाढतो, विद्यार्थ्यांनी वाचत राहिले पाहिजे त्यातून आपली प्रगती होते हे लक्षात घ्यावे असे सांगुण पुस्तकं हे आपल्या प्रगतीचे साधन असल्याचे सूचित केले.या वाचन उपक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक,विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवाला, शेवटी विद्यार्थी विकास विभागाच्या डॉ.चित्रा धामणे आणि ग्रंथालय विभागाच्या वतीने श्री लोमटे यांनी सर्वांचे आभार मानले.

## साहित्य निकेतन ग्रंथालयाच्या वतीने उदय निरगुडकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन

### जागतिक किर्तीचे पखवाज वादक उध्दवराव बापू आपेगांवकर यांचे पखवाज वादन



अंबाजोगाई

येथील साहित्य निकेतन ग्रंथालय, अंबाजोगाई यांच्या वतीने प्रसिद्ध पत्रकार तथा अभ्यासू वक्ते उदय निरगुडकर यांच्या व्याख्यानाचे व जागतिक किर्तीचे पखवाज वादक उध्दवराव बापू आपेगांवकर यांच्या मंगलमय पखवाज वादनाचे आयोजन मंगळवार, दिनांक २२ ऑक्टोबर रोजी करण्यात आले आहे. अशी माहिती देवून या कार्यक्रमास अंबाजोगाई शहर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन साहित्य निकेतन ग्रंथालय, अंबाजोगाई यांच्या वतीने करण्यात आले आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेले अंबाजोगाईतील वैभवशाली ग्रंथालय साहित्य निकेतनने नुकतेच ८० व्या वर्षांत पदार्पण केले आहे. त्यानिमित्त समाजामध्ये पुस्तक प्रेम वृद्धिंगत व्हावे, समाजातील सांस्कृतिक व चिंतनशील विचारांची देवाण - घेवाण वाढावी या हेतूने साहित्य निकेतन ग्रंथालय आपल्या परीने विशेष प्रयत्न करीत आहे. अशाच एक प्रयत्नांतून यावर्षी ऑगस्ट महिन्यात गीत रामायणाचे रचयिते व प्रख्यात साहित्यिक, कवी, गीतकार ग.दि.माडगूळकर यांच्या सिद्धहस्त लेखणीतून उतरलेली रसाळ कृष्ण कथा ''गीत गोपाल''चा संगीतमय कार्यक्रम आयोजित केला होता. त्याला अंबानगरीतील सुजाण नागरिक, रसिक श्रोत्यांनी भरभरून प्रतिसाद दिला होता. पुन्हा एकदा असाच एक वेगळा विषय घेऊन येत्या मंगळवारी, दिनांक २२ ऑक्टोबर २०२४ रोजी आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह, अंबाजोगाई येथे दुपारी ४ वाजता जागतिक किर्तीचे पखवाज वादक उध्दवराव बापू आपेगांवकर यांचे मंगलमय पखवाज वादन सादर होणार आहे. त्यानंतर नामवंत पत्रकार व चिंतनशील अभ्यासू वक्ते उदय निरगुडकर यांचे 'विकसित भारतातील महाराष्ट्राचे योगदान' या विषयावरील व्याख्यान होणार आहे. उदय निरगुडकर यांनी मागील दोन दशकांहून अधिक काळ शिक्षण, पायाभूत सुविधा, व्यवस्थापन कौशल्य, आर्थिक क्षेत्र, आयटी उद्योग तसेच न्यूज मिडीया अशा अनेक ठिकाणी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्वाच्या पदांवर कार्य केले आहे. त्यांचा अनुभव व त्यातून त्यांनी केलेले चिंतन ऐकण्यासाठी आपण व आपले सर्व सहकारी यांनी व्याख्यानासाठी आवर्जून उपस्थित रहावे असे आग्रहाचे आमंत्रण व आवाहन साहित्य निकेतन ग्रंथालय, अंबाजोगाई यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## बंडूभाऊ मस्के यांचा उत्कृष्ट कार्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने गौरव

### निराधारांची सेवा करू शकलो हे माझं भाग्य- बंडू मस्के



वडवणी । प्रतिनिधी

धारूर तालुक्याचे श्रावण बाळ निराधार योजनेचे विद्यमान सदस्य तथा गावचे नेते माजी सरपंच बंडूभाऊ मस्के यांनी हजारो निराधारांना श्रावण बाळ निराधार योजनेचा लाभ मिळवून दिल्याबद्दल पहाडी पारगाव ग्रामस्थांच्या वतीने भव्य जाहीर सत्कार सोहळ्याचा कार्यक्रम जिल्हा परिषद शाळेच्या प्रारंगणात आयोजित करण्यात आला. सविस्तर वृत्तांत असा की,पहाडी पारगाव गावातील शेकडो निराधार नागरिकांना श्रावण बाळ निराधार योजनेतून पगार सुरू केल्याबद्दल गावचे नेते बंडूभाऊ मस्के यांचा शनिवार दि.१९ ऑक्टोबर २०२४ रोजी जिल्हा परिषद शाळेच्या प्रारंगणामध्ये सहपत्नीक भव्य जाहीर नागरी सत्कार सोहळा संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच बालासाहेब अंडील तसेच सत्कारमूर्ती बंडूभाऊ मस्के त्यांच्या अर्धांगिनी सौ.कस्तुराबाई मस्के तर प्रमुख अतिथी म्हणून उपसरपंच हनुमंत बप्पा मुंडे,संचालक सटवा अंडील,उद्धव रूद्रे, ग्रामपंचायत सदस्य धर्मराज मुंडे,ग्रामपंचायत सदस्य माणिक मस्के आदीजन मान्यवर म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी हनुमंत बप्पा मुंडे यांनी शुभेच्छा पर विचार व्यक्त करताना ते म्हणाले की,निराधारांचे आधारवड असणारे बंडूभाऊ मस्के यांनी आपल्या गावातील ८०० ते ९००निराधारांना श्रावण बाळ निराधार योजनेतून पगार सुरू केल्याबद्दल त्यांचे गावकऱ्यांच्या वतीने मी अभिनंदन करतो गावातील नागरिकांची इच्छा आहे की त्यांनी भोगलवाडी जिल्हा परिषद गटामधून उभे राहावे गावाचा,तालुक्याचा विकास करावा जसे निराधारांचे आधार बनलात तसेच सर्वसामान्यांचे आधार बनावेत असे विचार व्यक्त केले त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते सत्कार मूर्ती,बंडूभाऊ मस्के यांना हर,शाल,गुलाल लावून गावकऱ्यांच्या वतीने सहपत्नीक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सत्कारमूर्ती सत्काराला उत्तर देताना बंडूभाऊ मस्के म्हणाले की,मी सरपंच असताना जातीपातीचे राजकारण न करता गावाच्या विकासाच राजकारण केलं शासनाच्या वेगवेगळ्या योजना गावात राबवल्या गावाचा विकास केला तसेच निराधारांची सेवा करू शकलो हे माझे भाग्य आहे अशीच लोकसेवा करण्याची संधी मिळण्यासाठी मी भोगलवाडी जिल्हा परिषद गटातून निवडणूक लढण्यासाठी इच्छुक आहे आपण साथ द्यावी या ठिकाणी माझा सत्कार केल्याबद्दल मनापासून गावकऱ्यांचे आभार मानतो असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक सटवा अंडील यांनी केले तर उपस्थितांचे आभार माणिक मस्के यांनी मानले. या कार्यक्रमासाठी श्री.विलास गवळी,श्री.नवनाथ ईरमले, ग्रामपंचायत सदस्य अभिमान ढगे तसेच गावातील मोठ्या संख्येने ग्रामस्थ व लहान थोर मंडळी उपस्थित होते.

## ऑनेस्टी पब्लिक स्कूलमध्ये आरोग्य शिबिर




माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहरातील छत्रपती शिवाजी नगर येथील ऑनेस्टी पब्लिक स्कूल युनिट २ येथील सर्व विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणी व आहारा विषयी मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी माजलगाव येथील डॉ. मोहर जाधव ( दंतरोग तज्ञ) यांनी दातांची काळजी कशी घ्यायची, रोज सकाळ - संध्याकाळ ब्रश करण्यापासून ते बाहेरील गोड पदार्थ, चॉकलेट चे अतिसेवन न करणे याविषयी चिमुकल्यांना मार्गदर्शन केले. ग्रामीण रुग्णलयाच्या आरोग्य अधिकारी डॉ. योगिता भगत यांनी आहार मार्गदर्शन, मोबाईल चा अतिवापरामुळे होणारे दुष्परिणाम या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. शिबिराचे उद्घाटन सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले.

यावेळी शाळेच्या प्राचार्या अमृता रामेश्वर तोर यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक प्रमुख प्रभा हरकळ, स्कूल कोऑर्डिनेटर सुप्रिया निलेश गरुड, संगीत शिक्षिका श्रुती कुलकर्णी, सुशीला जोशी, खोसरे ताई यांनी परिश्रम घेतले.

# माजलगावात बाबरी मुंडे व माधव निर्मळ कोणाचा करणार गेम?

## थांबणार कोण? लढणार कोण? जिंकणार कोण?

**अर्जुन मुंडे । वडवणी**

माजलगाव विधानसभा मतदार संघाकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. कारण माजलगाव मतदार संघात अनेक उमेदवार इच्छुक आहेत आणखी एकाही पक्षाचा उमेदवार जाहिर झालेला नाही. आ.प्रकाश( दादा )सोळंके यांनीच निवडणुक लढवावी अशी मागणी केली जात आहे. परंतु त्या ठिकाणी प्रकाशदादांनी घरातील विसंवाद रस्त्यावर नको म्हणून दुर राहणे पसंत केले आहे. परंतु पक्ष ऐकायला तयार नाही. आजच्या स्थितीत माजलगावातून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने महायुतीकडून कोण लढणार हे स्पष्ट नाही. तशीच परिस्थिती महाविकास आघाडीची दिसून येत आहे. या ठिकाणी अद्याप उमेदवार जाहिर झालेला नसला तरी सर्वाधिकपणे पक्षाची पसंती ही रमेश आडसकर यांना दिसते आहे. बहुधा त्यांचीच उमेदवारी जाहिर होईल या मतदार संघातून निवडणुक लढविण्यासाठी युवा नेते बाबरी मुंडे हे सुद्धा उत्सुक असून त्यांनी जोरदार तयारी सुरु केली आहे. तर उद्योजक माधव निर्मळ यांनी सुद्धा आपण निवडणुक लढविण्यावर ठाम असल्याचे सांगितले आहे. या ठिकाणची लढत ही प्रामुख्याने ओबीसी




विरुद्ध मराठा अशीच होईल असे सांगण्यात येत आहे. त्यामुळे कोण जिंकणार? या प्रश्नाचे उत्तर कोणाही नेत्यांकडे नाही. परंतु यामध्ये बाबरी मुंडे आणि माधव निर्मळ हे कोणाचा गेम करणार? याकडे मतदार संघाचे लक्ष असणार आहे. आजच्या स्थितीला जिंकणार कोण? लढणार कोण?आणि रोखणार कोण? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

माजलगाव विधानसभा मतदार संघ हा गेल्या वर्षभरापासून चर्चेत राहिलेला मतदारसंघ आहे. या मतदार संघाने मराठा क्रांती आंदोलनाच्या वेळी महत्वपूर्ण भुमिका निभावली आहे. या मतदार संघात

### ओबीसी समाजाची ताकत ओबीसीचे भुज-बळ ओबीसी उमेदवारासाठी देणार -प्रा.वैजनाथ शिंदे

आरक्षणाची मोठी धग पाहयला मिळाली. लोकसभा निवडणुकीतच मतदार संघातून मोठा परिणाम दिसेल अशी चर्चा होती मात्र सर्व नेत्यांनी ताकद लावून त्या ठिकाणी भाजपाच्या बाजूने ९५० मतांची आघाडी भाजपाला दिली. महायुतीमध्ये ही जागा राष्ट्रवादी कॉंग्रेस अजितदादा पवार पक्षाच्या वाट्याला गेली आहे. त्यामुळे या ठिकाणाहून विद्यमान आमदार प्रकाश सोळंके व त्यांचे पुतणे जयसिंह सोळंके यांचे नाव अग्रक्रमावर आहे. परंतु या ठिकाणी आ.सोळंके यांनी निवडणुक लढविण्यास अनुत्सुकता दाखविली आहे. माझ्या ऐवजी पुतण्याला उमेदवारी द्यावी असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. परंतु पक्ष हा मानायला तयार नाही त्या ठिकाणाहून राष्ट्रवादीला जिंकावयाचे असेल तर आ.सोळंकेंनीच



लढले पाहिजे ही पक्षाची भुमिका आहे. ही जागा महायुतीमध्ये राष्ट्रवादीच्या ताब्यात गेल्याने भाजपाला या ठिकाणी संधी नसल्याने भाजप नेते रमेश आडसकर यांनी थेट शरदचंद्र पवारांच्या दरबारात जावून माजलगावातून निवडणुक लढविण्याचे निश्चित केले आहे. येत्या दोन दिवसात त्यांची उमेदवारी जाहिर होईल. आजच्या स्थितीला महायुतीकडून प्रकाश सोळंके व महाविकास आघाडीकडून रमेश आडसकर ही लढत मानली जात आहे. वंचित बहुजन आघाडीने या ठिकाणी माजी नगराध्यक्ष शेख मंजुर यांना उमेदवारी जाहिर केली आहे. तिसरी आघाडी, रासप, मनसे व इतर राजकीय पक्षांचे उमेदवार ठरलेले नाहीत. परंतु या ठिकाणाहून युवा नेते बाबरी मुंडे आणि माधव निर्मळ यांनी निवडणुक लढविण्याची भुमिका स्पष्ट केलेली आहे. महायुती व महाविकास



आघाडीच्या उमेदवाराला ओबीसी समाज मदत करेल का? हा प्रश्न आहे. त्यामुळे निर्मळ व मुंडे हे निवडणुक लढविण्यावर ठाम आहेत दोघांमध्ये समझोता होवून कोणीही एक उमेदवार येईल अशी शक्यता आहे.परंतु ओबीसी समाजाचे सुद्धा अनेक उमेदवार मैदानात येवू शकतात ज्यामध्ये प्रकाश शेंडगे यांचा ओबीसी बहुजन आघाडी पक्षाच्या वतीने यशवंत गायके यांचीही उमेदवारी पुढे येत आहे. मतविभागणी मोठ्या प्रमाणात होत असल्याने रोखावे कोणाला? हा प्रश्न आहे. जेवढी मत विभागणी मराठा समाजात होणार आहे तेवढीच विभागणी ओबीसी मतदारात होईल असे दिसते आहे.त्यामुळे रोखणार कोण ?लढणार कोण? आणि जिंकणार कोण? असा प्रश्न उपस्थित होत आहे. शिवाय मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील हे आपली ताकद कोणाच्या पाठिशी उभी करतात हे ही पाहणे महत्वाचे ठरणार आहे. बाबरी मुंडे हे या भागातील एक लोकप्रिय युवा नेतृत्व आहे. वडवणी व परिसरात त्यांना मानणारा मोठा वर्ग आहे. शिवाय आ.पंकजाताई मुंडे यांचे निष्ठावंत सहकारी म्हणून त्यांची ओळख आहे. वडवणी नगरपंचायतमध्ये गेली पाच वर्ष त्यांची सत्ता होती आणि आता १७ पैकी ८ नगरसेवक त्यांच्या सोबत आहेत. तसेच माधव निर्मळ हे उद्योजक असून नर्मदा उद्योग समूह हा नामांकित उद्योग समूह असल्याने अनेक बेरोजगारांना त्यांनी काम दिले आहे. तसेच या भागामध्ये धनगर समाजसुद्धा मोठ्या प्रमाणात असून समाजामध्ये त्यांचा लौकिक आहे. शिवाय सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचे मोठे योगदान राहिलेले आहे. म्हणून अशा तरुण सहकार्याच्या पाठिशी आपण जात,पात,धर्म,पंथ न पाहता उभे राहण्याची भुमिका अनेकांनी घेतली आहे. त्यामुळे माजलगावची निवडणुक यावेळी अटीतटीची व प्रतिष्ठेची असणार आहे.

# नंदिनी कुलकर्णीची इंद्रधनुष्य अंतरविद्यापिठीय महोत्सवासाठी निवड

अंबाजोगाई प्रतिनिधी

खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाईच्या संगीत व सांस्कृतिक विभागाची बी, ए, प्रथम वर्षाची विद्यार्थ्यांनी कु, नंदिनी विष्णुपंथ कुलकर्णी हिची अकोला येथे होणार्या इंद्रधनुष्य अंतर विद्यापीठीय महोत्सवासाठी निवड झाली आहे.

ही स्पर्धा दि. ७,८,९ व १० नोव्हेंबर २०२४ रोजी अकोला येथे संपन्न होणार आहे. या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झालेल्या इंद्रधनुष्य अंतर विद्यापीठीय युवक पुर्व चाचणी मध्थे समुह गायन भारतीय व समुह गायन पाश्चात्य कला प्रकारामध्ये निवड झाली आहे.




ह्या यशाबद्दल कु. नंदिनीचा महाविद्यालयाध्ये सत्कार करण्यात आला. याप्रसंगी भारतीय शिक्षण प्रसारक संसदेचे सन्माननीय अध्यक्ष डॉ. श्री. सुरेंद्रजी आलुरकर, संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंतजी वैद्य, प्रशासकीय अधिकारी प्रा. श्री. चंद्रकांतजी मुळे खोलेश्वर संकुलाचे अध्यक्ष श्री. विजयराव वालवडकर, कार्यवाह श्री. किरणदादा कोदरकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंदजी देवर्षी तसेच सर्व उपप्राचार्य पर्यवेक्षक प्राध्यापक विद्यार्थी बंधुभगिनीनी तिचे अभिनंदन केले.

# मुस्लिम बांधवांच्या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहा -आस्ताकभाई शेख

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आ. भीमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी आष्टी येथे मतदारसंघातील अल्पसंख्याक (मुस्लिम) समाज बांधवांच्या संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे या मेळाव्याला मतदारसंघातील मुस्लिम बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आष्टी येथील युवा नेते आस्तकभाई शेख यांनी केले आहे.

याबाबत अधिक माहिती देताना आस्ताकभाई शेख यांनी सांगितले की, माजी आमदार भीमराव धोंडे हे एकमेव नेते आहेत कि, ते सर्व जाती धर्माच्या लोकांना बरोबर घेऊन विकास कामे करतात त्यांनी २० वर्षात मतदारसंघाचा सर्वांगीण विकास केला आहे. आष्टी विधानसभा मतदारसंघात अल्पसंख्याक मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने आहेत. अनेकजण शासनाच्या विविध योजनांपासून वंचित आहेत. त्यांच्या अनेक समस्या आहेत त्या जाणून घेण्यासाठी आणि त्यावर चर्चा करण्यासाठी बुधवारी आष्टी येथे संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे तरी आष्टी, पाटोदा, शिरूर विधानसभा मतदारसंघातील अल्पसंख्याक मुस्लिम समाजाचे कार्यकर्ते व समाजबांधवांनी लक्ष्मी लॉन खडकत रोड आष्टी येथे बुधवारी २३ आक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन युवा नेते आस्ताकभाई शेख यांनी केले आहे.

# ज्येष्ठ पत्रकार गोपी लांडगे, दीपक कैतके, जान्हवी पाटील ,रवी उबाळे पुरस्काराने सन्मानित



उदगीरमध्ये मराठी पत्रकार साहित्य संमेलन उत्साहात

बीड । प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषदेशी संलग्न असलेल्या उदगीर पत्रकार संघाच्या वतीने उदगीर येथे रविवार दिनांक २० ऑक्टोबर रोजी मराठी पत्रकार साहित्य संमेलन उत्साहात पार पडले .यावेळी संविधान दिंडी काढून विविध शाळांनी सहभाग नोंदवला. यावेळी राज्यातील पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. या संमेलनाचे उद्घाटन मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस. एम. देशमुख यांनी केले. या कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे तर कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी सोलापूर विद्यापीठाचे पत्रकारिता विभाग प्रमुख डॉ. रवींद्र चिंचोलकर उपस्थित होते .

या पत्रकारिता साहित्य संमेलनात जेष्ठ पत्रकार गो.पी.लांडगे, नवराष्ट्रचे ब्युरोचीफ रवी उबाळे,मुंबई चे दिपक केतके,तर रत्नागीरीच्या जान्हवी पाटील यांच्या वतीने राजाभाऊ अदाटे यांनी पुरस्कार स्वीकारला.

# केजमध्ये आमदार नमिताताई मुंदडांना निवडणुकीत विजय होण्यासाठी विकास तारेल?

## मुंदडांचा खरा प्रतिस्पर्धी कोण? माजी आमदार साठे,ठोंबरे, गालफाडे की घाडगे

केज । प्रतिनिधी

केज विधानसभा राखीव मतदार संघ आहे आरक्षणाची ही शेवटची टर्म असल्याने सर्व इच्छुक उमेदवार उमेदवारीसाठी अथक प्रयत्न करत आहेत भाजपाकडून विद्यमान आमदार नमिताताई मुंदडा यांच्याशिवाय पक्षाकडे कोणीही उमेदवारी मागितली नाही त्यामुळे आमदार नमिता मुंदडांची उमेदवारी अंतिम मानली जाते गेल्या २५ वर्षाच्या कार्यकाळात जेवढा विकास निधी केज मतदार संघात आला नाही तेवढा विकास निधी विद्यमान आमदार नमिताताई मुंदडा यांनी आपल्या दुसऱ्या टप्प्यातील दोन अडीच वर्षात आणला हा विकास आगामी विधानसभा निवडणुकीत मुंदडांना विजय होण्यासाठी तारेल का ? असाही सवाल केला जात आहे.



मतदारसंघात आमदार नमिताताई मुंदडा यांना महाविकास आघाडीच्या वतीने प्रतिस्पर्धी उमेदवार कोण ?अशीही चर्चा केज विधानसभा मतदारसंघात होत आहे आज अचानक राष्ट्रवादी शरद पवार गटातर्फे संभाव्य उमेदवाराची यादी न्यूज चैनल वर झळकत आहे त्यात संभाव्य उमेदवार म्हणून माजी आमदार पृथ्वीराज साठे यांचे नाव येत आहे मग इतर इच्छुक उमेदवारात माजी आमदार प्राध्यापक संगीताताई ठोंबरे, रमेश गालफाडे, अंजली घाडगे काय भूमिका घेणार असाही सवाल केला जात आहे माजी आमदार प्रा संगीता ताई ठोंबरे व डॉ अंजली घाडगे यांनी मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांचीही भेट घेतली होती जर आघाडीची उमेदवारी माजी आमदार साठेंना मिळाली

◀◀ पान ३ वर

# जिल्ह्यासह महाराष्ट्रातील शिवसंग्राम डॉ. ज्योतीताई यांच्या पाठीशी -प्रभाकर कोलंगडे

बीड । प्रतिनिधी

नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार पक्षात पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, आदरणीय खासदार शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या उपस्थितीत दी.२० ऑक्टोबर रोजी मुंबईत शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी प्रवेश केला याप्रसंगी प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील, राष्ट्रीय कार्याध्यक्ष, महासंसदरत्न खासदार सुप्रियाताई सुळे ,राज्याचे माजी उपमुख्यमंत्री व ज्येष्ठ नेते



विजयसिंह मोहिते- पाटील, खासदार धैर्यशील मोहिते- पाटील, आ. शशिकांत शिंदे उपस्थित होते. या प्रवेशाच्या पार्श्वभूमीवर आज बीड जिल्हा शिवसंग्रामच्या प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते यांची बैठक संपन्न झाली. या बैतकित सर्वानुमते शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती मेटे यांच्या निर्णयाचे स्वागत करण्यात आले आणि संपूर्ण बीड जिल्हा शिवसंग्राम खंबीर पने डॉ. मेटे यांच्या पाठीशी उभी राहिल असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. तसेच या प्रवेशाचे उपस्थित कार्यकर्ते, पदाधिकारी यांनी देखील स्वागत केले.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घडामोडी वेग घेत असून काल आपल्या नेत्या डॉ. ज्योतीताई

◀◀ पान ३ वर

# मांजरा धरणाचे सहाव्यांदा दोन दरवाजे उघडले

केज । प्रतिनिधी

बीड,लातूर व धाराशिव जिल्ह्यातील पाच तालुक्यातील ७२ गावाला पिण्याच्या पाण्यासाठी आणी शेती सिंचनासाठी महत्वपूर्ण असणारे केज तालुक्यातील धनेगाव येथील मांजरा धरण २५ सप्टेंबर २०२४ रोजी पूर्ण क्षमतेने भरले. त्यानंतर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या पावसामुळे मांजरा धरणात पाण्याची आवक जास्त प्रमाणात चालू आसल्यामुळे मांजरा धरणाची पाणी पातळी नियंत्रित ठेवण्याच्या दृष्टीने दिनांक १९ रोजी सायंकाळी ६-०० वाजता सहाव्यांदा मांजरा धरणाचे दोन दरवाजे १ व ६ ०.२५ मीटर



उंचीने उघडण्यात आले आसुन १ हजार ७४७ क्यूसेक्स ( ४९.४८क्यूमेक्स ) इतका पाण्याचा विसर्ग मांजरा नदीपात्रात सुरू करण्यात आला आहे. मांजरा धरण हे पुर्ण क्षमतेने भरल्या नंतर आजपर्यंत चार वेळा एकूण ६२.३९८दलघमी इतके पाणी मांजरा नदीपात्रात सोडण्यात आले आहे.यापुढे धरणात येणाऱ्या पाण्याची आवक पाहता पाण्याचा विसर्ग कमी किंवा जास्त करण्यात येणार आहे. त्यामुळे मांजरा नदी काठावरील बाधित होणाऱ्या गावातील नागरीकांनी सतर्क रहावे.नागरिकांनी नदीपात्रात प्रवेश करू नये व कुठलीही जिवीत अथवा वित्त हानी होणार नाही याची दक्षता घ्यावी.आसे आवाहन मांजरा धरणाचे शाखाधिकारी सुरज निकम यांनी केले आहे.

# परतुर मतदारसंघाच्या विकासाकरिता पाच वर्षात सात हजार कोटीचा निधी आणला

**जालना । प्रतिनिधी**

परतूर विधानसभा मतदारसंघात शेगाव पंढरपूर दिंडी महामार्ग या सह प्रमुख राज्य मार्ग महामार्ग जिल्हा मार्ग गावा गावाला जोडणारे रस्ते, प्रत्येक रस्त्यावर पूल, गावागावातील तांडे वाड्या वस्त्यावरील पाणंद रस्ते परतुर शहरातील उड्डाणपूल, स्वर्गीय भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वातानुकूलित नाट्यगृह, वंदनीय विश्वरत्न परम पूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह



तालुका व जिल्हा सत्र न्यायालयाच्या इमारती, क्रीडा संकुल, गावा गावात २४ तास वीज उपलब्ध होण्यासाठी नवीन पोल व डिप्या करीता आणी मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण केंद्र व राज्य सरकार च्या माध्यमातून गेल्या पाच वर्षात सात हजार कोटी रुपये निधी उपलब्ध करून आणला असल्याची माहिती माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली. कोकेश्वरी मंगल कार्यालय कोकरसा ता.मंठा

◀◀ पान ३ वर

# समाजमाध्यमावर फोटो टाकण्याची धमकी देऊन, तरुणीवर दोन वर्षे अत्याचार

**भाडेकरू नराधमाला केलं जेरबंद**

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील मधूबन कॉलनीत राहणार्या एका २२ वर्षीय तरुणीच्या घरात खोली भाड्याने घेऊन, कार्तिक भाऊसाहेब नरवडे (रा. मानदेऊळगाव, ता. बदनापूर) हा त्याच्या आईसोबत राहत होता.

त्यादरम्यान, सदर तरुणी नरवडे याच्या आईला भेटण्यासाठी त्याच्या खोलीत गेली असताना, त्याने तिच्यासोबत एक सेल्फी फोटो काढला होता. त्यावेळी त्यास तिने फोटो डिलिट करण्यासाठी वारंवार विनवणी केली तरी त्याने तो फोटो डिलिट केला होता. त्यानंतर काही दिवसांनी तो सदर तरुणीची खोली सोडून, देहेडकरवाडी भागात भाड्याने खोली घेऊन, राहण्यासाठी गेला होता. सदर तरुणीला गेल्या दोन वर्षांपासून आपले दोघांचे फोटो समाजमाध्यमावर टाकून, व्हायरल करीन, अशी धमकी देऊन, देहेडकरवाडी भागात खोलीवर बोलावून घेऊन, तिच्यावर अनेकवेळा बलात्कार केला. तसेच, ३० सप्टेंबर २०२४ रोजीदेखील संभाजीनगर रोडवरील करमाडजवळ असलेल्या लॉजवर नेऊन सदर तरुणीवर कार्तिक नरवडे याने बलात्कार केला होता. याप्रकरणी कदीम जालना पोलीसांनी रविवारी रात्री उशिरा गुन्हा दाखल केला आहे. कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सिध्दार्थ माने, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानदेव नागरे, किशोर वनवे, प्र. पोलीस उपनिरीक्षक नेमाने यांच्यासह पिंक पथकाने तातडीने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आहे. दरम्यान, आज आरोपी कार्तिक नरवडे यास ताब्यात घेतले आहे.

गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक किशोर वनवे हे करीत असून, त्यांना पिंक मोबाईल पथकाचे कर्मचारी मदन डोईफोडे, सुमित्रा अंभोरे, चालक नाथा दिवटे आदी सहकार्य करीत आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

मंगळवार, दि.२२ ऑक्टोबर २०२४ । पान ७

# पुण्यात सहा वेगवेगळ्या विमानात बॉम्ब ठेवणार असल्याचं धक्कादायक ट्विट; धमक्यांची मालिका सुरूच!

**पुणे । प्रतिनिधी**

देशातील प्रवासी विमानांना बॉम्बच्या धमक्यांची मालिका सुरूच आहे. गेल्या शनिवार १९ ऑक्टोबरला ३० हून अधिक विमानांना बॉम्बची धमकी देण्यात आली होती. त्यामुळे विमानांचे इमर्जन्सी लँडिंग करण्यात आले. त्यानंतर पूर्ण तपासणीनंतर विमाने रवाना करण्यात आली. त्यामुळे शेकडो प्रवाशांचे तासनतास हाल झाले. हा खळबळजनक प्रकारा ताजा असताना पुण्यातून अशीच एक बातमी समोर आली आहे.



पुण्यात सहा वेगवेगळ्या विमानात बॉम्ब ठेवणार असल्याचं धक्कादायक ट्विट समोर आले आहे. विस्तारा एअरलाईन्सच्या ६ वेगवेगळ्या विमानात बॉम्ब ठेवण्यात येणार असल्याचं ट्विट करण्यात आले आहे. या ट्विटच्या माध्यमातून दहशत पसरवण्याचा प्रयत्न केल्याचे बोलले जात आहे. पुण्यातील विमान नगर पोलीस स्टेशनमध्ये ट्विट करणाऱ्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. मात्र या ट्विटमुळे सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे.

६ वेगवेगळ्या विमानामध्ये १२ जण बॉम्ब ठेवणार?

मिळालेल्या माहितीनुसार, स्किझोफेर्निया या ट्विटर अकाऊंटवरून अज्ञात इसमाने हे ट्विट केले होते. यात ६ वेगवेगळ्या विमानामध्ये १२ जण बॉम्ब ठेवणार असल्याची ट्विटमधून माहिती देण्यात आली होती. दरम्यान, या प्रकरणी विमानतळ पोलिसांनी अज्ञात व्यक्ति विरोधात गुन्हा दाखल केला असून ट्विटद्वारे दहशत पसरवण्याच्या प्रयत्न करणाऱ्या आरोपीचा शोध सध्या सुरु करण्यात आला आहे. यातील आरोपीने ६ विमानांचे नंबरही ट्विटमध्ये टाकले होते आणि बॉम्ब ठेवण्यात येणार असल्याचे ट्विट मध्ये उल्लेख केला आहे.

ट्विट करणाऱ्याविरोधात गुन्हा दाखल

सिझोफेनिया १११ असे ट्विटर अकाऊंट वापरकर्त्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार सिंगापूर ते पुणे विमान प्रवासादरम्यान ट्विटरद्वारे रविवारी दुपारी दीड वाजता घडला. मेसेजमध्ये १२ जण विमानात असून त्यापैकी ६ जण तुमच्या विमानात बॉम्बसह आहेत. फ्लाईट यु के २४, फ्लाईट यु के १०६, फ्लाईट युके १४६, फ्लाईट युके ११६, फ्लाईट युके ११०, फ्लाईट युके १०७ (प्रत्येकी २ जण) सर्व जण संपणार आहेत. असा मेसेज मिळाला आहे. तर एअरपोर्ट परिसरातील नागरिक आणि प्रवाशांमध्ये खोटी माहिती आणि अफवा पसरवून भितीदायक वातावरण निर्माण केल्याचे तक्रारीत म्हटले आहे

# पोलीस आयुक्तांच्या पत्नीचे ८० लाखांचे प्रकरण; व्यावसायिकाला अटकपूर्व जामीन

पुणे : पुण्याच्या माजी आयुक्तांच्या पत्नीची ८० लाखांची फसवणूक केल्याचा आरोप असलेल्या तरूण व्यावसायिकाला तपासास सहकार्य करण्याबरोबरच साक्षीदारावर दबाव न आणण्याच्या अटीवर जिल्हा व सत्र न्यायाधीश यू एम मुधोळकर यांनी कायमस्वरूपी अटकपूर्व जामीन मंजूर केला.




पिटर शुक्ला असे अटकपूर्व जामीन मंजूर झालेल्या व्यावसायिकाचे नाव आहे. तरुण व्यावसायिकाने ड. विजयसिंह ठोंबरे यांच्यामार्फत अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. माजी आयुक्त कै. वसंत बाळ मोडक यांच्या पत्नी अनिता मोडक यांनी ऑगस्ट २०२३ मध्ये पिटर शुक्ला याच्या विरुद्ध ८० लाख घेऊन फसवणूक केल्यासंबंधी लेखी अर्ज दिला होता.

या तक्रार अर्जावर वारंवार व्यावसायिकाला क्राईम ब्रँच येथे बोलवून त्याला पैसे द्या अन्यथा गुन्हा दाखल करण्यात येईल अशी ताकीद देण्यात आली होती. तरुण व्यावसायिकाने अटकपूर्व जामिनासाठी सत्र न्यायाधीश एस बी हेडाऊ यांच्या न्यायालयात अर्ज केला. त्यावेळी न्यायाधीश हेडाऊ यांनी आरोपीला अंतरिम अटकपूर्व जामीन मंजूर केला होता. तब्बल एक वर्षानंतर मूळ अर्ज सुनावणी साठी आल्यानंतर ड. विजयसिंह ठोंबरे यांनी केवळ पैशाच्या वसुलीसाठी पोलीस यंत्रणेचा वापर करता येणार नाही. आरोपीने अनिता मोडक यांना धनादेश देखील दिले असून, केवळ तत्काळ पैसे वसुलीसाठी बनावट गुन्हा दाखल करून व्यावसायिकाला त्रास दिला जात असल्याचा युक्तिवाद केला. न्यायालयाने दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकून आरोपीला अटी शर्तींवर जामीन मंजूर केला.

# डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात सामाजिक उपक्रम

**पुणे । प्रतिनिधी**

डॉ. डी. वाय. पाटील यांच्या ८९ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात, आकुर्डीच्या एनएसएस युनिट ए १०६ तर्फे नवक्षितीज विशेष देखभाल गृह, मारुंजी येथे सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते.




तसेच रोट्रॅक्ट डीवायपीसीओई व प्राधिकरण रोटरी क्लबच्या सहकार्याने नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये महाविद्यालयाच्या २१३ कर्मचाऱ्यांनी नेत्र तपासणी करून घेतली, त्यात मोतीबिंदूसह इतर नेत्र तपासणीचा समावेश होता. महाविद्यालयाच्या वतीने मानसिक अपंगत्व असलेल्या व्यक्तींना आनंद देण्यासाठी आणि त्यांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी मारुंजी येथील नवक्षितीज विशेष देखभाल गृहाला प्रिंटर आणि ५० खुर्च्या भेट दिल्या. यावेळी डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे कॅम्पस डायरेक्टर अमित विक्रम, मुख्य वित्त अधिकारी बी. एच. शर्मा, प्रा. डॉ. पी. मालती, कुलसचिव पी. एन. भालेराव, एस. एस. सरनोबत आणि एनएसएस कार्यक्रम अधिकारी महेश तातिकोंडा यांच्या मार्गदर्शनाखाली हे कार्यक्रम पार पडले. या कार्यक्रमात नवक्षितीज विशेष देखभाल गृहाचे संस्थापक डॉ. चंद्रशेखर देसाई, व्यवस्थापकीय विश्वस्त प्रा. स्मिता शेट्टी, मुख्य कार्यकारी सदस्य संतोष मुंडे, इव्हेंट मॅनेजर महेंद्र सूर्यवंशी आणि एचआर मॅनेजर प्रशांत उपस्थित होते.

# दाऊद, बिश्नोईचे स्टेट्स ठेवल्यामुळे तिघांना अटक; २३ ऑक्टोबरपर्यंत कोठडी

**पुणे । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्धिकी यांची हत्या केल्यानंतर पुन्हा चर्चेत आलेला गॅंगस्टर लॉरेन्स बिश्नोई आणि कुख्यात गुंड दाऊद इब्राहिमचे फोटो असलेले स्टेट्स ठेवणाऱ्या तिघांना लोणी काळभोर पोलिसांनी अटक केली आहे. २० ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडे सहाच्या सुमारास हा प्रकार उघडकीस आला.




या प्रकरणी ४० वर्षीय व्यक्तीने लोणी काळभोर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या प्रकरणात तिघांना प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी टी. एस. गायगोले यांच्या न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी, सरकार पक्षाच्या वतीने सहायक सरकारी वकील ॲड. भाग्यश्री संचेती (डांगळे) यांनी युक्तिवाद केला की, आरोपींचा दाऊद इब्राहिम टोळीशी काही संबंध आहे का याचा तपास करायचा आहे. त्यांनी स्टोरीवर ठेवलेले आक्षेपार्ह स्टेट्स कोठे बनविले, त्यांना स्टेट्स ठेवण्यास कोणी प्रवृत्त केले, त्यासाठी कोणी चिथावणी दिली आहे का याखेरीज यामध्ये आणखी कोणाकोणाचा सहभाग आहे याचा सखोल तपास करायचा आहे. त्यामुळे त्यांना पोलिस कोठडी देण्याची मागणी ॲड. संचेती यांनी केली. न्यायालयाने ती मान्य करत तिघांना २३ ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली

# गाजावाजा करुन उद्घाटन झालेल्या पुण्यातील मंडई मेट्रो स्थानकला भीषण आग

**पुणे । प्रतिनिधी**

महात्मा फुले मंडई परिसरातील मेट्रोस्थानकात रविवारी मध्यरात्री आग (झींपश चरपवरळ ऋळीश) लागल्याची घटना घडली. या घटनेची माहिती मिळतात अग्निशामक दलाचे पाच अग्निशमन बंब घटनास्थळी दाखल झाले. मध्यरात्री १२ च्या सुमारास मंडईच्या मेट्रो स्टेशनला आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशामक दल त्या ठिकाणी दाखल झाले. २६ सप्टेंबर रोजी या मेट्रोस्थानकाचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पार पडलं होतं.

मध्यरात्री बाराच्या सुमारास मंडई मेट्रो स्टेशन येथे तळमजल्यावर फोमच्या साहित्याला आग लागून मोठ्या प्रमाणात धूर निर्माण झाला होता. अग्निशमन दलाकडून तातडीने ५ वाहने रवाना करत आग पाचच मिनिटात आटोक्यात आणली.



**प्रवाशांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह**

**मेट्रो स्थानकाटे मोठे नुकसान झाले असले तरी रात्री आग लागल्याने प्रवाशांची वर्दळ नव्हती.त्यामुळे सुदैवाने कोणतीही जीवीतहानी झाली नाही. मेट्रोचे काम अर्धवट असताना उद्घाटन केल्याने अशा घटना घडल्याने पुन्हा एकदा प्रवाशांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.**

जवानांनी श्वसनरहीत अग्निशमन उपकरणाचा वापर करत पाणी मारुन आग विझवली. जखमी कोणी नसून आग वेल्डिंगचे काम सुरु असताना लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे .

# एमसीएच्या सचिवपदी कमलेश पिसाळ; तर मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून अजिंक्य जोशी यांची नियुक्ती

पुणे : महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत कमलेश पिसाळ यांची सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर अजिंक्य जोशी यांची मुख्य कार्यकारी अधिकारीपदी बढती मिळाली आहे. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत कमलेश पिसाळ हे अंतरिम सन्मानीय सचिव म्हणून कार्यरत होते, परंतु त्यांची पुन्हा नियुक्ती केल्यानंतर सर्व सदस्यांनी त्यांना पाठिंबा देत विश्वास दर्शवला.

एमसीए- वार्षिक सर्वसाधारण सभेत नवनियुक्त्या

एमसीए चे अध्यक्ष रोहित पवार यांनी काल झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत रोहित पवार यांनी नवनियुक्त सचिव आणि कार्यकारी अधिकाऱ्यांचे कौतुक केले, त्याचबरोबर एमसीएचे धोरणात कार्यक्रमांची रुपरेषा मांडली. आगामी काळात महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन बीसीसीआय च्या प्रमुख स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन आपली



आपली उत्कृष्ट कामगिरी दाखवून देईल. त्यानंतर येथील स्टेडियमच्या दर्जेदार पायाभूत सुविधा उपलब्ध केल्या जातील. तसेच, महाराष्ट्रातून उच्च गुणवत्तेचे खेळाडू भारताला कसे देता येईल, यावर आमचा फोकस राहील, असेही रोहित पवार यांनी सांगितले. महाराष्ट्राच्या तेजल हसबनीसची आगामी न्यूझीलंड विरुद्ध होणाऱ्या मालिकेसाठी भारतीय संघात निवड झाल्याचेदेखील रोहित पवार यांनी सांगितले.

राष्ट्रीय क्रिकेट अकादमीप्रमाणे कार्यरत राहील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएसन ही कायम छउ- प्रमाणे कार्य करील. ही अकादमी तरुण प्रतिभा घडवण्यासाठी आणि जखमी खेळाडूंचे पुनर्वसन करण्यासाठी कायम कार्यरत राहील अशी ग्वाही देखील रोहित पवार यांनी दिली. चउ- ने स्टेडियमच्या पायाभूत सुविधा आणि खेळाडूंच्या विकासावर कायमच भर दिल्याचे रोहित पवार यांनी सांगितले. त्यानंतर नवनियुक्त सदस्य देखील ध्येयवादी योजनांसह असोसिएशनच्या यशस्वी आणि स्थिर प्रगतीच्या दिशेने ठोस पावले उचलत राहील, असेही रोहित पवार यांनी स्पष्ट केले.

# शेवटपर्यंत काँग्रेसमध्येच राहणार; भाजपत प्रवेशाच्या वृत्ताचा बागवेंकडून इन्कार

**पुणे । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या अनेक बड्या नेत्यांचे पक्षांतर सुरु झालं आहे. त्यातच पुण्यातील काँग्रसचे बडे नेते आणि माजी गृहराज्यमंत्री रमेश बागवे आणि त्यांचे पुत्र नगरसेवक अविनाश बागवे हे भाजपच्या वाटेवर असल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. पण हे वृत्त खोटं असल्याचं स्पष्टीकरण बागवे पिता-पुत्रांनी दिलं आहे. आम्ही गेल्या चाळीस वर्षांपासून काँग्रेससोबत आहोत आणि भविष्यात पण काँग्रेसमध्ये राहणार आहोत, असं रमेश बागवे यांनी म्हटलं आहे.

रमेश बागवे यांनी स्पष्टीकरण देताना म्हटलं की, आयुष्यात भाजपत जाण्याचा विचार माझ्या स्वप्नातही आलेला नाही. मी ओरिजिनल काँग्रेसचा आहे. गेली ४० वर्षे मी काँग्रेसची सेवा केलीली मंडळी आहोत. आम्ही ओरिजिनल काँग्रेसचे आहोत. मी, माझा समाज आणि माझं कुटुंब हे काँग्रेसला मानणारे आहेत. आम्ही संविधानवादी आहोत आम्ही मनुवादी विचारांच्याविरोधात काम करणारी माणसं



आहोत. भाजपत जाण्याचं आमच्या स्वप्नातही येणार नाही. आम्ही मरेपर्यंत काँग्रेसचे आहोत आणि मरेपर्यंत काँग्रेसमध्येच राहणार आहोत. इलेक्शनमध्ये तुम्हाला दिसेल की बागवे आणि त्यांचं कुटुंब आणि कार्यकर्ते हे काँग्रेसचे आहेत आणि काँग्रेसचेच राहणार त्याचबरोबर रमेश बागवे यांचे पुत्र नगरसेवक अविनाश बागवे यांनी म्हटलं की, गेल्या अनेक निवडणुकांमध्ये काही लोक मुद्दाम या बातम्या पेरुन लोकांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळं या बातमीत कुठलंही तथ्य नाही. माझे वडील रमेश बागवे हे महाराष्ट्र काँग्रेस कमिटीचे वरिष्ठ उपाध्यक्ष आहेत. मी गेल्या पंधरा वर्षापासून पुणे महापालिकेत नगरसेवक म्हणून काम करत आहे.

अनेकदा आम्हाला ऑफर आल्या तरी आम्ही कुठेही गेलो नाही. पण आता आम्ही कष्ट करुन मेहनतीनं काँग्रेस पक्षाला उभारी देण्याचं काम करत आहोत. मग आता आम्ही कशाला दुसऱ्या पक्षाचा विचार करु. त्यामुळं आमच्या भाजपत जाण्याच्या बातम्यांमध्ये कुठलंही तथ्य नाही, अशा कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवू नका. आम्ही आधीही काँग्रेसचे होते, आत्ताही आहोत आणि भविष्यातही राहणार आहोत.

# अल्पवयीन मुलीस पळविणार्यास पोलिसांनी पाठलाग करून पकडले

**पिंपरी । प्रतिनिधी**

लग्नाचे अमिष दाखवून एका १४ वर्षीय मुलीला मध्यरात्री अडीच वाजताच्या सुमारास जाधववाडी चिखली येथून पळवून नेले. याबाबत वायरलेसवरून संदेश मिळताच बावधन पोलिसांच्या बीट मार्शलने शिरवळपर्यंत पाठलाग करीत त्या मुलीची सुटका केली.

वसीम अब्दुलकरीम शहा (वय २२, रा. कोहिनूर कॉलनी, रुपीनगर, जाधववाडी, चिखली) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत ३३ वर्षीय नातेवाईकाने याबाबत चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी पहाटे अडीच वाजताच्या सुमारास फिर्यादी यांच्या नातेवाईक असलेल्या १४ वर्षीय मुलीस आरोपी वसीम याने लग्न आणि संसाराचे आमिष दाखवून (एमएच १४ केए ६५४८) या टेम्पोतून पळवून नेले. ही बाब नातेवाईकांच्या लक्षात येताच त्यांनी चिखली पोलीस ठाणे गाठले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता चिखली पोलिसांनी आरोपीच्या टेम्पोचा नंबर व माहिती वायरलेस द्वारे सर्व पोलीस ठाण्यांना कळविली. दिलेल्या माहितीचा टेम्पो बावधन पोलिसांच्या बीट मार्शलाला दिसला. त्यांनी टेम्पोचा पाठलाग सुरू केला. मात्र टेम्पो वेगात असल्याने तो हाती लागला नाही. शिरवळ येथे रस्त्याचे काम सुरू असल्याने या ठिकाणी वाहतूक संथ गतीने सुरू होती. त्यावेळी बावधन पोलिसांनी टेम्पोला आपली दुचाकी आडवी घालून आरोपीला ताब्यात घेतले. तसेच अल्पवयीन मुलीची सुटका केली. या कामगिरीबाबत चिखली पोलिसांच्या समयसूचकतेचे आणि बावधन पोलिसांच्या बीट मार्शलचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पुरंदरबाबत महायुती, 'मविआ'चा सस्पेन्स अजूनही कायम; अंतर्गत कुरघोडीचा फायदा कोणाला होणार?

सासवड /संभाजी महामुनी: महाविकास आघाडी आणि महायुती मधील विधानसभा निवडणुकीतील जागा वाटप अंतिम टप्प्यात आले आहे. राज्यातील उमेदवारांच्या उमेदवारी जाहीर होत असताना पुरंदर तालुक्याबाबत अद्यापही संस्पेन्स ठेवण्यात आला आहे. महाविकास आघाडी आणि महायुती मधील सर्वच सहकारी पक्षांकडून उमेदवारीची मागणी करण्यात येत आहे.



पुरंदर मधील राजकीय पक्षांचे सर्वच नेते उमेदवारी मिळावी यासाठी मेळावे घेवून आपली भूमिका जाहीर करीत आहेत. आमदार संजय जगताप यांनीही आपल्या उमेदवारी कायम ठेवत गाव भेटीतून कार्यकर्त्यांशी संवाद साधण्याचा धडाका लावला आहे. कोणत्याच पक्षाकडून अद्याप उमेदवार जाहीर झाले नसले तरी आपल्यालाच उमेदवारी मिळणार यासाठी सर्वच राजकीय नेत्यांनी जोरदार फील्डिंग लावली आहे. त्यामुळे निवडणुकीत आतापासूनच चुरस निर्माण झाल्याने लक्षवेधी होण्याची शक्यता आहे.

महाविकास आघाडी आणि महायुतीच्या नेत्यांनी बऱ्यापैकी जागा वाटप केले आहे. मात्र अडचणीच्या ठिकाणी अद्यापही संस्पेन्स बाळगलेला दिसून येत आहे. यामध्ये पुरंदर विधानसभा मतदार संघाचा समावेश असून यंदा आपल्यालाच उमेदवारी मिळावी म्हणून सर्वच पक्षांनी ताकद लावली आहे. महायुती मधील राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि भाजप या सर्वच पक्ष नेत्यांनी उमेदवारीची मागणी केली आहे. यासाठी मेळाव्याच्या माध्यमातून शक्ती प्रदर्शन करण्यात आले.

राष्ट्रवादीचे दिगंबर दुर्गाडे, भाजपचे गंगाराम जगदाळे, शिवसेनेचे विजय शिवतारे तसेच पुरंदर तालुका भाजपच्या वतीने स्वतंत्र मेळावे घेवून उमेदवारीची मागणी करण्यात आली. सर्वच उमेदवारीची मागणी करीत असल्याने पक्ष नेत्यांपुढे मोठा पेच निर्माण झाला आहे.

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते संभाजीराव झेंडे यांनी निवडणुकीचे रणसिंग फुंकले आहे. आपल्यालाच उमेदवारी मिळावी यासाठी पक्षप्रमुख शरद पवार, सुप्रिया सुळे यांच्या भेटीगाठी घेवून त्यांची मनधरणी तसेच वेगवेगळ्या माध्यमातून दबावतंत्राचा वापर केला जात आहे. तसेच उमेदवारी न मिळाल्यास स्वतंत्र निवडणुका लढविण्याचीही तयारी केली आहे.

एकीकडे उमेदवारी मिळविण्यासाठी दोन्हीकडे रस्सीखेच सुरु असताना आमदार संजय जगताप यांनी मात्र कोणालाही न दुखावता एकला चलो ची भूमिका घेवून थेट गाव भेटीचे सत्र सुरु केले आहे. काही दिवसापूर्वी संभाजीराव झेंडे यांच्यासोबत सोशल वॉर झाल्यानंतर त्याचे विरोधी पक्षांना भांडवल होवू नये यासाठी कोणतीही प्रतिक्रिया देण्यास असमर्थता दर्शवली आहे. एवढेच नाही तर आपण महाविकास आघाडी म्हणून निवडणूक लढविणार असून कोणत्याही पदाधिकारी अथवा कार्यकर्ता यांनी वाद निर्माण होईल असे वक्तव्य करू नयेत अशा सक्त सूचना दिल्या आहेत. त्यामुळे सहकारी पक्षांसह विरोधीपक्ष एकमेकांवर टीका, चिखलफेक आणि कुरघोडी करीत असताना संजय जगताप यांनी मात्र कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेवून थेट मतदारांच्या दारात पोहोचण्यात आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे. अद्याप कोणाचीही उमेदवारी जाहीर झालेली नाही अथवा अर्जही दाखल झालेले नाही. त्यामुळे मने दुखाविण्यापेक्षा त्यांच्यातील अंतर्गत कुरघोडीचा फायदा कसा घेता येईल या दृष्टीने त्यांची रणनीती चालू असलेले दिसून येत आहे.

# आमदार रवींद्र धंगेकराच्या हिंदमाता प्रतिष्ठानविरुद्ध आचारसंहिता भंगाचा गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

कसब्यातील काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर यांच्या हिंदमाता प्रतिष्ठानकडून दिवाळीनिमित्त साबण, उटणे वाटप करण्यात येत असल्याची तक्रार निवडणूक आयोगाकडे करण्यात आली. त्यानंतर रविवारी (दि. २०) रात्री उशिरा धंगेकर यांच्या हिंदमाता प्रतिष्ठानविरुद्ध आचारसंहिता भंग केल्याप्रकरणी समर्थ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.



याबाबत निवडणूक आयोगातील अधिकाऱ्यांनी समर्थ पोलिस ठाण्यात तक्रार दिली, 'दरवर्षी माझा मित्र परिवार आनंदाची दिवाळी भेट देतो. या उपक्रमात माझा व्यक्तिशः सहभाग नाही. मला अजून उमेदवारी जाहीर झालेली नाही. माझा कसब्यातून विजय पक्का असल्याने विरोधकांच्या मनात धडकी भरली आहे, असे धंगेकर यांनी स्पष्ट केले. माझ्यासारखेच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांविरुद्ध गुन्हा दाखल करावा, अशी मागणी त्यांनी केली.